

आघाडीवरचा सोनचाफा — कॅ. गो. गं. लिमये

शनिवार १७ ऑक्टोबर ७०

चाळीस पैसे

# माणूस

मग हे नवे चेहरे ?
या लांबच लांब रांगा ?
माणूसने यासाठी......

**श्री. दिलीप माजगावकर** **अलीपुर, कलकत्ता**

**सप्रेम नमस्कार**

पावसाने झोडपत झोडपत दुपारी १ वा. इथे पोचलो. गेले चार दिवस कलकत्ता म्हणजे एक सरोवर झाले आहे. रस्त्यात रूळांवर पाणी चढले होते. जवळ जवळ सगळा पश्चिम बंगाल पुराने वाहून गेला आहे.

आता मुख्य कामाबद्दल: पूर्व पाकिस्तानात नुकत्याच उडालेल्या पुराच्या हाहाकारामुळे पाकिस्तानने निर्वासित पाठवणे एकदम बंद केले आहे असे कळते. उद्या चौकशी करतो.

आपल्याला कल्पना येणार नाही इतकी इथली परिस्थिती स्फोटक आहे. असे घर नाही की ज्यावर माओचा फोटो, वचने नाहीत. हे काम लोक रात्री करतात. बाँब सहा आण्यापासून तीन रुपयांपर्यंत हातगाड्यांवर मिळतात. एक बरे उतारूंना उतरवून मग बसेस जाळतात. पत्र श्री. गं. ना. दाखवावे.

...

**सप्रेम नमस्कार** **महाराष्ट्र निवास, कलकत्ता**

या कलकत्त्यात राहणे म्हणजे हार्ट अॅटॅक ओढवून घेणे वाटते. प्रत्येकजण जीव मुठीत धरून चालतो. फारच प्रेशर येतं. इथल्या लोकांना सराव झाला आहे. उद्या पाऊस ओसरेल. नंतर पुढे जातो.......

...

**सप्रेम नमस्कार** **रेल्वे स्टेशन, कलकत्ता**

आज सबंध दिवस सरहद्दीवर जाण्याच्या खटपटीत होतो. परंतु गाड्या बंद. कारण अचाट पाऊस. पाकिस्तान निर्वासितांचे तीन कॅम्प्स आहेत. बोनपूर, बशीरहाट, हस्नाबाद. पहिला शुक्रवारी खुला करण्यात येईल. जे निर्वासित येत आहेत ते आदिवासी, खेडूत आहेत. ते सर्व असामी-बंगाली मिश्रणाची बोली बोलणारे.पण भाषेची अडचण ओलांडीन. आसाम पूर्ण अलग पडला आहे.

...

**सप्रेम नमस्कार** **सिआल्दा रेल्वे स्टेशन**

मी आज इथे पोचलो. ज्वालामुखीच्या कुंडातून लाव्हा वहावा तसे नागडे उघडे गलिच्छ निर्वासित सिआल्दा स्टेशनच्या आत बाहेर करत आहेत. अंगाला पाणी नाही, धड वस्त्र नाही, केसांच्या जटा झाल्या आहेत. इंच न् इंच त्यांनी व्यापला

मलपृष्ठ १ वर...

शनिवार १७ ऑक्टोबर १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : सत्ताविसावा | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | तीस रुपये | साठ रुपये |


## सप्रेम नमस्कार....

□ आपल्या दि. ३० च्या 'माणूस'मध्ये श्री. अनिल वर्वे यांनी ज्या 'विजय-नगरम्'चा उल्लेख केला आहे ते निराळे आहे. ते वरंगळच्या काकतीय राज्यातील असावे.

विजयनगरच्या साम्राज्याची राजधानी असलेले विजयनगर शहर तुंगभद्रा नदीच्या दक्षिणेकडे वसलेले होते. ते ठिकाण सध्याच्या म्हैसूर राज्यात आहे. तालि-कोटच्या लढाईनंतर त्या शहराचा संपूर्ण विध्वंस करण्यात आला. (आफ्रिकेतील कार्थेजप्रमाणे) त्या लढाईनंतर विजयनगर नावाचे शहर राहिले नाही. मात्र ती जागा शहर स्थापन होण्यापूर्वीच्या तेथे असलेल्या मूळच्या गावावरून ओळखली जाऊ लागली. त्या खेड्याचे नाव 'हंपी' असे आहे.

एका डॉक्यूमेंटरीमध्ये हंपी, तेथील तलाव व विरूपाक्षाचे मंदिर दाखविण्यात आले होते. इतिहासाच्या दृष्टीने हंपी येथे असलेले अवशेष पूर्वीच्या विजयनगर साम्राज्याचे मानले जातात.

**३० सप्टेंबर, १९७०** **के. श्री. औराबकर, बीड**

**द्विसाप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९**

**प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' द्विसाप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.**



अरुण गोसावी

# स्तंभ एकटा !

चर्नीरोडवर तिरपणारी एक टळटळीत दुपार. संध्याकाळकडे झुकणारी. डांबरी रस्ता तापलेला, भाजून काढणारी हवा, कपड्यांखालून घामाच्या धारा आणि दिमाग गरम. मागे धडाडत जाणाऱ्या लोकल्स आणि त्यांच्याही पलीकडे दूरवर समुद्र ! बसचा लाल ठिपका कुठे दिसतो आहे ? उलटच्या बाजूने खूप बसेस जाता-हेत. इकडे टाचा घासणारी माणसे आणि घामेजल्या चेहऱ्याच्या बाया. बस लवकर का येत नाही न् सूर्य लवकर का मावळत नाही ? डोक्यात घाव. उन्हाचे की तसेच. बस आली. गर्दी, धावपळ, खेचाखेच. क्रांतिमैदान–आय मीन गवालिया टँक ? नही–नही उतरो चलो.

दुसरी बस खेचाखेच गवालिया टँक नही उतरो चलो.

तिसरी बस खेचाखेच गवालिया टँक नही उतरो चलो.

चौथी बस खेचाखेच गवालिया टँक सिर्फ एक आदमी बाकी उतरो चलो.

गरगरणारे बधीर डोके. कोण, का, कशाला, कुठे, कुणासाठी यांची चक्रावणारी वीण आणि टाचा घासणे. घाम पुसणे. श्वास टाकणे. डोके का गरगरते ? बस नाही म्हणून ? ऊन म्हणून ? कंटाळा म्हणून ? दोन ऑक्टोबर म्हणून ? मुंबई म्हणून ?

डोके खरोखरच बधीर. सर्व कोलाहलाचा एकच ध्वनी. फरक न करता येण्या-सारखा. शेजारचा त्याच्या शेजारच्याला काय सांगतो आहे ?–तो नवीन आलेला... व्हिस्कीचा ब्रँड. एकदम स्कॉचची चव. दोन तीन महिने ठीक. आता एकदम पुनः चव उतरली. रद्दड–

अप्टन सिंक्लेअर आणि शुक्राचार्यांचा इथे काय संबंध ? आणि हो गांधींचा तरी काय ?

पाचवी बस खचाखेच वगैरे.

सहावी बस खेचाखेच वगैरे.

टाचा घासणे.

आता एकदम चार रिकाम्या बसेस याव्यात. त्या सर्वांमध्ये बसून जावं. आरा-

मात. घाम पुसत. किंवा त्या बॉंब टाकून उडवून द्याव्यात.

मुंबईचं विष नसानसात भिनलं आहे. सर्व नसांमध्ये. आता त्या नसा फुगतील. आणि आणि फाडकन फुटतील. का, कोण, कशाला, कुठे—

सूर्य आणखी तिरपलेला आहे. मागून एक समुद्रावरची जीवघेणी थंडगार झुळुक विष उतरवणारी.

सातवी बस, खेचाखेच गवालिया टॅंक चार आदमी, धक्का मत लगाव चलो उपर. कट् कट् कट् गवालिया टॅंक पंधरा पैसे.

थरारणारी बस. घाम वाळवणारी हवा. समुद्रावरची हवा. सूर्य आणखी तिरपलेला. कदाचित बुडायला आला असेल.

गवालिया टॅंक—नव्हे क्रांतिमैदान. सकाळीच उद्घाटन झालेला नवा उंच क्रांतिस्तंभ. हृदयात काही भरून येत आहे ? काही उचंबळते आहे ? मस्तक झुकते आहे ! हॅं : हॅं : हॅं : हॅं...शम्मीकपूर असतो तर या ऽऽऽ हू करून आरोळी ठोकली असती. सिमेंटच्या त्या रुक्ष खांबावर वरच्या टोकाला बुडणाऱ्या सूर्याची शेवटची सोनेरी किरणं पुसटशी चाटून जाताहेत. काही उपयोग ? चलो.

पलीकडे नशाबंदी मंडळाची सभा. व्यासपीठावर गांधीजींचे केविलवाणे चित्र. श्रोत्यांमध्ये तेरा वर्षांखालील मुलेमुली आणि पन्नाशीवरचे पुरुष—स्त्रिया. पाहुणे यायचे आहेत. आजूबाजूच्या किती पुरुषांच्या चेहऱ्यावर मनसोक्त मद्यपानाच्या खुणा आहेत ? दोन ऑक्टोबर. पाहुणे यायचे आहेत. मुले गाणे म्हणतात, ' उचललेस तू मीठ मूठभर साम्राज्याचा खचला पाया.'

हातातला ग्रॅहम ग्रीन कुठवर आला आहे ? दोन पुरुष. एकाची बायको ती दुसऱ्याची प्रेयसी. ती मेलेली. मृत्यूमुळे मैत्रीच्या घट्ट बंधनात गुंतलेले. नवऱ्याच्या घरातील व्हिस्कीची शेवटची बाटली संपविताहेत. तिचे प्रेत वरच्या खोलीत आहे.

जाड भिंगेवाला मित्र येतो. ग्रीन खिशात. पाहुणे अजून आलेले नाहीत. ' उचललेस तू मीठ —' अजून चालू आहे.

पाहुणे येतात. हार, तुरे, टाळ्या, स्वागतगीत. स्वागत भाषण. भाषण.

शेजारी एक जरठ कुमारिका वाटणारी, पन्नाशीच्या वरची, गुजराती किंवा पारशी, स्वातंत्र्यपूर्व काळात चळवळीत भाग घेतला असल्याचा भाव चेहऱ्यावर असणारी, खादी नेसलेली, चष्मेवाली येऊन बसली आहे.

ती दोन मिनिटं ऐकते मग इंग्रजीत म्हणते, कशाला हा गृहस्थ बोलतो आहे ? त्याचाही वेळ आणि आमचाही वेळ घालवायचा.

थोडा वेळ ऐकते. मग चडफडून बोलते, ' हॅं : दारूबंदी म्हणे. नुसती बडबड. दोन ऑक्टोबरला बडबड करायची न् विसरून जायचं.'

एक मिनिट ऐकते न कानाशी खेकसते, ' हिपोक्रॅट्स, आपण सगळे ढोंगी आहोत. बिचाऱ्या गांधींना उगाच ताप देतो आहोत.'

पन्नास सेकंद ऐकते न् लक्ष वेधून घेण्यासाठी हातावर हलकी चापट मारून कानाशी ओरडते, 'नॉन्सेन्स. मला हे सहन करवत नाही. आपला देश रसातळाला चालला आहे.'

ती तावातावाने उठते न् तरतरा निघून जाते. सुस्कारा. सुटका झाल्याचे समाधान.

पाहुण्याबाई भरलेल्या आवाजात सांगताहेत. हेच ते मैदान, आठवा ती आठ ऑगस्ट एकोणीसशे बेचाळीसची संध्याकाळ. तुफान गर्दी होती. बापू म्हणाले चले जाव –

संध्याकाळ झाली आहे. आजबाजूला मुलं खेळताहेत. मैदानाच्या चारी बाजूंनी प्रचंड बसेस धावताहेत. वर आकाशात घारी उडताहेत. खिशातला ग्रीन काय म्हणत होता बरं ?

जाड भिंगवाला मित्र मात्र जोरजोरात सिगरेटी फुंकत आहे. गहिवरून बोलणाऱ्या पाहुण्याबाईंकडे भिंगाआडून भारल्यासारखा बघतो आहे.

पाहुण्याबाईंचे भाषण संपते. टाळ्या. आणखी भाषण. टाळ्या. गर्दी पांगते. दिवेलागण झाली आहे. जाड भिंगवाला खांद्यावर हात ठेवून सिगरेट फुंकतो आहे- 'चला क्रांतिस्तंभ पाहू या.'

स्तंभावर आता प्रकाशझोत सोडले आहेत. स्तंभ तळपतो आहे. आजूबाजूला बाग आहे. मध्ये स्तंभ एकटा उभा आहे. तेजस्वी दिव्यांच्या प्रकाशात तळपणारा.

जाड भिंगवाला स्तंभाकडे टक लावून बघतो. खालपासून वरपर्यंत बघतो. कुणी बघत नाही असे पाहून लाजत लाजत नमस्कार करतो. नजरानजर झाल्यावर अपराध्यासारखा चेहरा करतो. ओशाळवाणा हसतो. खांद्यावर हात टाकून सिगरेट फुंकीत बस-स्टॉपकडे चालू लागतो.

दिवे लागलेले आहेत. अंधार पडलेला आहे. रंगीबेरंगी नियॉन साईन्स चमकताहेत

---


# व्होल्गा जेव्हा लाल होते

लेखक : वि. स. वाळिंबे

मूल्य : अठरा रुपये

राजहंस प्रकाशन : १०२५ सदाशिव पेठ : पुणे ३०

दुकाने हॉटेले चमकताहेत. मोटारींचे दिवे डोळे दिपवून जाताहेत. नटून थटून अंधार-उजेडाचा फायदा घेऊन बाया-माणसं हिंडू फिरू लागली आहेत. मुंबईची रोरावणारी रक्तात भिनणारी विषारी, पागल रहदारी चारी बाजूंनी झेपावते आहे.

जाड भिंगवाला शांत आहे. अबोल झाला आहे. सिगरेटी ओढतो आहे.

मग खांद्यावर हात टाकून हळूच म्हणतो, 'असं आहे, तुमच्या पिढीला कळणार नाही. त्या आठ ऑगस्टच्या सभेला मी हजर होतो.'

थांबतो. सिगरेटचे झुरके. मग, 'ते काळं फाटक दिसतं आहे ना त्याच्या समोरच्या एका ट्रकवर उभा होतो. काय गर्दी, काय स्पिरीट, ते दिवस वेगळे होते. तो वेगळा अनुभव होता. तुम्हाला कळणार नाही.'

पुन्हा झुरके. 'थ्रील होतं. हे असे गांधी आले. सगळी भाषणं ऐकली. सभा संपली तो कोण खेचाखेच. माझी तर मानच कशात तरी अडकली. गळा घुसमटला. कसा तरी निसटलो.'

झुरके. 'दुसरे दिवशी कॉलेज सोडलं. आणि चळवळीत उडी घेतली. शिक्षण सुटलं ते कायमचं.'

संध्याकाळची गर्दी वाढते आहे. रहदारी वाढते आहे. बसेस रोरावताहेत. नियॉन साईन्स चमकताहेत आणि समोरचा तो क्रांतिस्तंभ प्रकाश झोतामध्ये तळपतो आहे.

गर्दी वाढतेच आहे. जाडभिंग सिगरेट ओढते आहे. का, कशाला, कशासाठी कोण—ही जपमाळ नाही. टाचा घासणे चालू आहे.

पहिली बस येते. खेचाखेच. फौंटन ? नही चलो उतरो.

दुसरी बस खेचाखेच फौंटन जगा नाही डबल घंटी.

तिसरी बस खेचाखेच वगैरे.

चौथी बस खेचाखेच. फौंटन चलो उपर दो फौंटन तीस पैसे वगैरे—

## नक्कलपट्टूंची पंचाईत

तुम्ही कल्ले वाढवाल. मिशा वाढवाल. खाली ओठावर गळणाऱ्या. केसही वाढवाल. रंगीबेरंगी बायकी शर्टस् घालाल. बेल बॉटम पँटही नेसाल.

पण डोके सफाचट करून भगवी कफनी परिधान करून गळयात तुळशीमाळा घालून टाळ मृदंगाचा ताल धरीत हरे कृष्ण हरे कृष्णाचा घोष करीत नंग्या पायांनी फौंटनला किंवा पुण्याच्या टिळक रस्त्यावर वा नागपूरच्या व्हरायटी स्क्वेअरमध्ये नाच कराल ? शक्यच नाही ! काय हिंमत.

निरुद्योगी अमेरिकन तरुणांच्या वेडया चाळयांची, थेरांची सही सही नक्कल करण्यात प्रावीण्य संपादन केलेल्या खुशालचेंडू श्रीमंत बापांच्या आमच्या भारतीय

कॉलेज तरुणांची हीच मोठी पंचाईत झाली आहे. अमेरिकन तरुणांचे थेर एवढ्या वेगाने बदलतात की आमच्या नक्कलपटू तरुणांनी अवाक् व्हावे. अमेरिकन तरुण स्वतः कुठला तरी नवा चाळा शोधून काढतात. पण स्वतः चाळा शोधून काढावा हे आमच्या तरुणांना पापसमान आहे. त्यांनी पश्चिमेकडून येणाऱ्या वाऱ्यावरच आपल्या फॅशनचे शीड उभारावे.

परवा मुंबईच्या फौंटनवर भर दुपारी काही ब्रिटीश व अमेरिकन तरुणांनी अशीच धमाल उडवून दिली. डोक्यावरचे सारे केस काढलेले, भगव्या कफन्या घातलेले हे गोरे तरुण हरे कृष्णच्या गजरात जल्लोषपूर्ण नाच करीत होते. त्यांच्याबरोबर काही मुलीही होत्या. देहभान विसरून सारे गात होते. नाचत होते. स्थानिक वृत्तपत्रांचे छायाचित्रकार फोटो काढीत होते.

ही कृष्णभक्तीची फॅशन ब्रिटन-अमेरिकेत नव्यानेच उदय पावलेली आहे. छोः ! ही काय फॅशन झाली. हा तर जुनाटपणा झाला. आमच्याकडची म्हातारी मंडळी असला वेडगळपणा करतात. हे काय भलतंच ! हजारो वर्षापासून चालत आलेल्या जुन्या गोष्टी काय अशा फॅशन म्हणून खपवायच्या ! शिवाय तशा अवस्थेत आमच्या वर्गातल्या मुलींनी पाहिलं तर ?

तेव्हा मुंबईची समस्त कल्लेवाली, बेलबॉटमवाली फॅशनभक्त मंडळी सध्या घोर संकटात सापडली आहेत. संभ्रमित झाली आहेत. गोटा करावा की न करावा, रस्त्यावर उघड्या अंगाने जावे की न जावे, कृष्णासारख्या देवाचा रस्त्यावर जप करावा की न करावा आणि हे सारे फॅशन म्हणून चालवून घ्यावे की न घ्यावे अशा हॅम्लेटी छापाच्या गंभीर प्रश्नांनी ही मंडळी सध्या ग्रस्त झालेली आहेत. या पाश्चात्य तरुणांनी हे थेर आणखी पुढे नेले तर, असाही मोठाच निर्वाणीचा प्रश्न या तरुणांपुढे आ वासून उभा आहे.

आतापर्यंत आमच्या तरुणांनी वाटेल ते सहन केले. त्यांनी दाढ्या वाढवल्या — यांनी वाढवल्या. त्यांनी केस राखले — यांनी राखले. त्यांनी घाणेरडे कपडे घातले — यांनी घातले. त्यांनी एल्. एस्. डी. घ्यायला सुरवात केली — यांनीही केली. त्यांच्यातल्या हुशार तरुणांनी आमच्या गांजा आणि भांगचा शोध लावला — आमच्या नक्कलपटू तरुणांनी तेही प्रयोग केले. मुंबईत तर अशा तरुणांचे रेग्युलर क्लब्ज् निघाले.

पण गोटा करून भगव्या कपड्यांनी हरे कृष्णचा घोष करणे ही मर्यादा झाली. आतापर्यंत आमच्या तरुणांनी खूप खपवून घेतले, पण आता ते एवढ्या खालच्या थरावर येणार नाहीत. ते आता स्वतःच्या काही फॅशन्स काढण्याच्या विचारात आहेत असे ऐकतो. ◻ ◻ ◻



रवींद्र पिंगे

# कॅप्टन लिमये

## ऐशीव्या वर्षी पुनर्जन्म

शामेचे रंगीत खडे जमवीत बसलेल्या एखाद्या छांदिष्ट माणसाला आसभास नसताना टपोरा पुष्कराज हिरा गवसावा आणि मग ती अपूर्व चीज त्याने भेटेल त्याला कौतुकाने दाखवत सुटावं, तसाच प्रकार कॅ. गोपाळ गंगाधर लिमये, कथासंपादक राम कोलारकर आणि प्रकाशक रामदास भटकळ ह्या तिघांच्या अचानक एकत्र येण्याने झाला आहे. कॅ. लिमयांनी कोणे एके काळी कथासुद्धा लिहिल्या होत्या हे सांगण्याचा वास्तविक हा काळ. कारण कॅ. लिमयांनी पहिल्या बहरात काही रेशमी पोताच्या सर्वस्वी स्वतंत्र आणि वेगळ्या कलात्मक घाटाच्या लघुकथा निव्वळ हौसेपोटी लिहिल्या. त्यावर आता अर्ध्या शतकाचा काळ लोटून गेला आहे. त्या सुट्या कात्रणांचा एक रीत म्हणून कुणीतरी 'वनज्योत्स्ना' हा संग्रह काढला. मोबदल्याची टक्केवारी, संग्रहाची विक्री, जाहीरात वगैरे फालतू प्रश्न उपस्थित होण्याचं तेव्हा कारणच नव्हतं. कारण आपल्या नावे एक पुस्तक छापून तयार झालं ह्या आनंदातच लेखक महाशय कृतकृत्य झाले. नंतर लेखक आणि प्रकाशक, दोघेही ती हौशी बाब विसरले. वाचकही विसरून गेले. अनेकजण तर ते पुस्तक वाचायचंही विसरून गेले. टीकाकार तर कथेच्या संदर्भात कॅ. लिमयांच्या नावाजवळसुद्धा फिरकले नाहीत. अखेर, जुन्या संग्रहालयांच्या बंदिस्त फडताळात पानं पिवळी पडत वाचकांना आचवलेला तो संग्रह गुपचूप पडून राहिला. त्यानंतर जवळपास चार तपं नद्यांचं पाणी आणि लेखक-प्रकाशकांची हिंमत वाहून गेल्यावर कॅ. लिमयांच्या कथासाहित्याचे प्रज्ञाशाली उन्मेष जुनी बाडं धुंडाळणाऱ्या कोलारकरांच्या साक्षेपी

दृष्टीला ' पडले ' नव्हे, भिडले. विशेषत: आधुनिक मराठी कथासाहित्यात आणि विद्वानांच्या तद्विषयक जडजंबाल टीकाग्रंथात कॅप्टन मजकुरांची नावनिशाणीही उरलेली नसताना, ही घटना घडावी ह्याचा सरळ अर्थ, मुहूर्त वगैरे बाबी गुंडाळून ठेवणाऱ्या बुद्धिप्रामाण्यवादी कॅ. लिमयांनी कुठल्या तरी कडक गुरुपुष्यामृत योगावरच आपल्या कथासाहित्याचे शीड उभारले असणार ! एरव्ही, वयाच्या ऐंशीव्या वर्षी मराठी सारस्वताच्या वाटचाला साहित्यातल्या एका रसरशीत शाखेच्या आद्य आणि एकमेव जनकत्वाचा मान स्वत: वा स्वतःच्या पित्याकरवी प्रयत्न न करता मिळावा, हे अप्रूप घडणं कसं शक्य आहे ?

पुण्याच्या टिळक रस्त्यावरल्या मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या टुमदार वास्तूत मुद्रक लाटकर, की नात्याने जे कॅप्टनसाहेबांचे जामात आहेत, आणि प्रकाशक भटकळ, की वृत्तीने जे गुणलोलूप आहेत, ह्यांनी ' आधुनिक मराठी लघुकथेचे शिल्पकार : १ : गोपाळ गंगाधर लिमये यांच्या निवडक कथा ' ह्या पुस्तकाच्या प्रकाशनाचा आणि कॅ. लिमयांच्या सत्काराचा एक सुखदरम्य सोहळा घडवून आणला. पु. ल. देशपांडे सभेचे अध्यक्ष आणि कवी कुसुमाग्रज वक्ते हा दुग्धशर्करा योग होता. त्यामुळे देवीदास बागूलांनी तयार केलेल्या गुटगुटीत टाईपातल्या चित्ताकर्षक आमंत्रण पत्रिका हातात पडल्यापासून आनंदाच्या ज्या झिणझिण्या निमंत्रितांनी अनुभवल्या, त्या कार्यक्रमाचे सूप वाजेपर्यंत वाढतच गेल्या. योगही असा की अनेकांनी कॅ. लिमयांना प्रथमच पाहिलं असेल ! कॅ. गो. गं. लिमये हे नाव नियतकालीकातून भेटतंच. पण एक तर ते निरुपद्रवी विनोदी लेखांच्या शिरोभागी, किंवा क्रमिक पुस्तकातल्या धड्यात. त्यामुळे ह्यांनी सकस कथालेखनसुद्धा केलं आहे हे आजच्या वाचकांच्या गावीही नाही. वि. सी. गुर्जर आणि दिवाकर कृष्ण ह्या दोघांकडे आधुनिक मराठी कथा वाङ्मयाचं जनकत्व जातं हे क्रमिकपुस्तकी मत शिरोधार्य मानून सर्वजण चालले. आता कोलारकरांनी तो जरीपटका कॅ. लिमयांच्या वृद्ध खांद्यावर सन्मानपूर्वक दिला आहे. कॅप्टनसाहेबांनीही विनय वगैरे सभामंचकावरल्या शोभेच्या वस्तू दूर सारून आपल्याला ह्या सन्मानामुळे आनंद झाला आहे आणि पुत्रजन्माचा आनंद सर्वांनाच होतो, पण बाळाचं बारसं दणक्यात झालं, चार आयाबाया जमल्या, म्हणजे तो आनंद अधिक खुलतो, तशी स्थिती आपली ह्या प्रकाशन सोहोळ्यामुळे झाली आहे असं खुल्लंखुल्लं सांगून टाकलं. ऐंशी वर्षांच्या ह्यातीतलं कॅ. लिमयांचं हे म्हणे दुसरं भाषण ! अवघं दोन मिनिटांचं !

ज्याला हा अग्रदूताचा मान दिला, त्या कॅ. लिमयांची एखादी कथा श्रोत्यांच्या कानी पडली तर पन्नास वर्षांपूर्वी ह्या बहाद्दराने कुठल्या अस्सल जातकुळीची चमक दाखवली होती, त्याची चुणूक कळेल हे पु. ल. नी नेमकं हेरून सौ. शकुंतला

पृष्ठ ४९ वर

सु. ल. सोमण

# नासेर ह्यांच्या मृत्यूनंतर

अध्यक्ष नासेर, ह्यांच्या अनपेक्षित मृत्यूने अरब जगात एक पोकळीच निर्माण झाली आहे.

कुठलीही वडी व्यक्ती मृत्यू पावली की तिच्या मृत्यूमुळे पोकळी निर्माण झाली आहे, असं म्हणण्याची सध्या फॅशन झाली आहे. परंतु अध्यक्ष नासेर ह्यांच्या बाबतीत मात्र ही शंभर टक्के वस्तुस्थिती आहे. इजिप्तमध्येच नव्हे तर संपूर्ण अरब जगतातच त्यांच्याइतकं प्रभावी नेतृत्व आज तरी नाही. आणि म्हणूनच १९६७ साली इस्त्रायलविरुद्ध पराभव स्वीकारूनही ते अरब जगताच्या नेतेपदी कायम राहू शकले. जॉर्डन आणि पॅलेस्टिनियन कमांडो ह्यांच्यातली ताजी युद्धबंदी, नासेर ह्यांच्या ह्या नेतृत्वाचीच साक्ष देऊन जाते ! नासेर मुळात अलिप्तावादी. किंबहुना त्यांच्या व नेहरूंच्या प्रयत्नांमुळेच केवळ अलिप्ततावादानं मूळ धरलं नि तो वाढीस लागला. अलीकडे अलीकडे नासेर रशियाकडे संपूर्ण झुकलेले दिसत होते, पण त्यालाही कारण सर्वस्वी पश्चिमी राष्ट्रेच आहेत ! नासेर इजिप्तमध्ये सत्तारूढ झाल्यापासून ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका ह्या पाश्चात्य राष्ट्रांनी दिलेल्या वागणुकीचा इतिहास जर चाळला, तर सुरुवातीला तटस्थता स्वीकारणारा व भांडवलशहांबरोबर कम्युनिस्टांनाही दूर ठेवणारा नेता, पुढे पुढे कम्युनिस्ट रशियाच्या आहारी का गेला ह्याचं कोडं सहज उलगडावं ! असं असलं, तरी देखील देशाचं हित लक्षात घेऊन त्यांनी अमेरिकेची शांति-योजना स्वीकारली, साहसवादी लाल चीनला तर त्यांनी मध्यपूर्वेपासून सतत दूर ठेवलं. स्वतःच्या हालचालींनी अरब एकजूट शक्यतो साधायचा प्रयत्न केला, आणि मध्यपूर्वेतला समतोल ढळू नये ह्याचीही दक्षता घेतली !

नासेर ह्यांच्या मृत्यूनंतर, हा दृष्टिकोन स्वीकारून अरब जगाचं नेतृत्व स्वीकारू शकेल अशी एकही व्यक्ती सध्या तरी दिसून येत नाही. चीनच्या मध्यपूर्वेतल्या साहसवादाच्या मार्गात नासेर मध्ये येत होते. नासेर दूर झाल्यामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा फायदा उचलायला चीन अर्थातच सरसावणार. नेमक्या ह्याचवेळी इस्त्रायलने बड्या राष्ट्रांचे पवित्रे ओळखून की काय, पण पॅलेस्टाईनमध्ये अरब गनिमांचं स्वतंत्र राष्ट्र निर्माण करून मध्यपूर्वेतला प्रश्न सोडवावा असं

सुचवलं आहे. कदाचित अरब गनिमांना उर्वरित अरबांपासून फोडून, इस्त्रायल व अरब जगत ह्यांच्या दरम्यान हे ' बफर राज्य ' असलं तर बरं असं इस्त्रायलला वाटत असावं ! कदाचित त्यामुळे चीनच्या हालचालींनाही आळा घालता येईल, असाही विचार असावा ! मध्यपूर्वेतलं हे प्रभावी व्यक्तिमत्त्व दूर झाल्यानंतर रशिया, अमेरिका, चीन, इस्त्रायल– सर्वांच्याच हालचाली वाढल्या आहेत. पंतप्रधान कौसिजीन कायरोत मुक्काम ठोकून अरब नेत्यांशी चर्चा करीत आहेत. तर प्रे. निक्सन अन्य मार्गाचा अवलंब करीत आहेत. काही झालं तरी अमेरिका व रशिया ह्या दोघांचेही ह्या भागात एवढे हितसंबंध गुंतलेले आहेत, की दोघेही ह्या भागात मोठ्या रणकंदनाला तयार होणार नाहीतच. शिवाय चीनलाही दूर ठेवण्यासाठी, कदाचित दोघं एकत्रही येतील. त्यातच कदाचित इस्त्रायलची सूचना मूळ धरेल ! तात्पर्य, निश्चित असं काही न घडता वातावरण मात्र तापत राहील. कारण दोन्ही बड्यांचा त्यातच फायदा आहे !

## मलेशियातले सत्तांतर

मलेशिया हे भारताचं शेजारी राष्ट्र ! पाकिस्तानबाबतची, भारताची बाजू, आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर हिरीरीनं मांडणारं एकमेव मुस्लीम राष्ट्र ! ह्या राष्ट्राच्या निर्मितीपासून, टुंकू अब्दुल रहमान हे तिथले निर्विवाद नेते. त्यांनी मागच्याच आठवड्यात पंतप्रधानपदाचा राजिनामा, राजे अब्दुल हलीम ह्यांना सादर केला. त्यांनी निवृत्त होण्याचा मानस तसा खूप पूर्वी जाहीर केला होता. परंतु काही काळापूर्वी (सुमारे १८ महिन्यापूर्वी) मलेशियात भडकलेल्या जातीय दंगलींनी त्यांना अडकवून ठेवलं होतं. आता परिस्थिती त्यांच्यामते खूपच निवळली आहे, नि म्हणूनच, त्यांनी सारी सूत्रे माजी उपपंतप्रधान टुन अब्दुल रझाक ह्यांच्या हाती सादर केली आहेत. टुन अब्दुल रझाक. हे अवघे अठ्ठेचाळीस वर्षाचे आहेत. एक उत्तम प्रशासक म्हणून त्यांची ख्याती आहे. असं असलं तरी टुंकू अब्दुल रहमान ह्यांची सर त्यांना येईल का ? काहीसं बोचरं व्यक्तिमत्त्व नि कडक वागणूक ह्यामुळे टुन रझाक मुळातच तेवढे प्रिय नाहीत. त्यातच त्यांच्यापुढे चिकार प्रश्न उभे आहेत.

मुख्य प्रश्न म्हणजे चिनी–मलायी ( व काही प्रमाणात हिंदी ) ह्यांच्यातली जातीय तेढ. मलायातले बहुसंख्य उद्योगधंदे, वरच्या नोकऱ्या हे सारं चिन्यांच्या किंवा भारतीयांच्या ताब्यात आहे. मलायनांच्या वाटेला भिकेचा कटोरा आहेच ! १८ महिन्यापूर्वीची जातीय दंगल अशाच कारणांतून उपटली. ह्या दंगलीपूर्व काळात टुंकूंनी ह्या प्रश्न मोठ्या कौशल्यानं हाताळला होता. चिन्यांना मिळणाऱ्या आर्थिक वर्चस्वाची भरपाई त्यांनी ग्रामीण विभागातनं राहणाऱ्या बहुसंख्य मलायनांकडे

राजकीय नेतृत्व सोपवून केली होती. परंतु हा समतोल पुढे ढळला. चिन्यांनी राजकीय क्षेत्रात आक्रमण तर केलंच, परंतु निवडणुकात घवघवीत यशही मिळवलं. त्यातनंच उफाळलेल्या असंतोषांनी दंगली उसळल्या. हजारोंचे बळी पडले. मलायन लोकसभा विसर्जित केली गेली. दंगली शमून अठरा महिने होऊनही पार्लमेंट अद्याप विसर्जितच आहे. जातीय विद्वेष जास्त जास्तच फोफावत आहे. चिनी तंत्रज्ञांना, त्यांच्याच योग्यतेच्या मलायन तंत्रज्ञांपेक्षा कमी पगार मिळतो. कित्येक चिनी तंत्रज्ञ ह्यामुळे मलायाबाहेर जाऊ पाहात आहेत. अर्थातच त्यामुळे तंत्रज्ञांचा तुटवडा भासत आहे! ह्याखेरीज लोकसभा पुन्हा बोलावून सैनिकी शासन त्यांना लवकरच दूर करावं लागणार आहे. त्यावेळी ह्या झगडणाऱ्या प्रवृत्तींना एकत्रित आणून जर ते भक्कम आर्थिक कार्यक्रम देऊ शकले तर ठीक आहे. नाही तर परिस्थिती अधिकच बिकट होईल! टुंकूंच्या सर्वंकष व्यक्तिमत्त्वाने तारेवरची कसरत करून, दोन्ही गटांमध्ये समतोल राखला व राज्यशकट सुस्थिरपणे चालवून मलायाची आर्थिक – सामाजिक उन्नती घडवून आणली. ह्याच भांडणाऱ्या प्रवृत्तींना श्री. टुन रझाक कसे हाताळतात, ह्यावरच मलेशियाची पुढची वाटचाल अवलंबून आहे. पण जर का पुन्हा दंगली उसळल्या तर आधीच वर्चस्व प्रस्थापित करून राहिलेल्या मलायन आर्मीतल्या एखाद्या अधिकाऱ्यालाच पुढे व्हावं लागेल. ¤ ¤ ¤

---

युगोस्लाव्हियाचे लोकप्रिय नेते प्रे. जोसेफ टिटो ह्यांना आता निवृत्तीचे वेध लागले आहेत. त्यासाठी त्यांनी हळूहळू सामूहिक नेतृत्वाचे प्रयोगही सुरू केले आहेत. निवृत्तीनंतर ज्या काही गोष्टी त्यांना करावयाच्या आहेत, त्यापैकी एक म्हणजे आत्मवृत्त लिखाण पूर्ण करणे. त्यांच्या त्या आत्मवृत्तातनंच रशियाबरोबरचे त्यांचे संबंध कसकसे बिघडत गेले ह्याचा इतिहास प्रथमच जगासमोर यायची शक्यता आहे...

१९४८ मधला प्रसंग. युगोस्लाव्हियातले रशियन वकील ॲनाटॉली लॅरेन्टीव्ह हे रशियन सत्ताधीश मा. स्टालिन ह्यांचा संदेश घेऊन प्रे. टिटोंना भेटायला गेले त्यांच्या झाग्रेब येथील प्रासादात. खलित्यात प्रे. टिटोंनी घेतलेल्या स्वतंत्र पवित्र्यांचा धिक्कार करून, मा. स्टालिननी म्हटलं होतं, "...ट्रॉट्स्कीच्या राजकीय जीवनाच्या शेवटाची आठवण करून देणं, मला वाटतं आपल्याला पुरेसं आहे!" प्रे. टिटो हादरले, पण शांत राहिले. ताठ राहिले. पण त्यांच्या जर्मन कुत्र्यानं मात्र प्रे. टिटोंच्या मनातल्या वादळाला तोंड फोडलं. तो रशियन वकिलावर धावून आला व त्याला कडकडून चावला.

प्रे. टिटो पुढे नमले तर नाहीतच, पण रशियाशी टक्कर देऊन, कम्युनिझम्‌च पण रशिया सांगल तसा नाही तर देशाला मानवेल तसा अंगिकारून, त्यांनी एक नवा आदर्श जगभरच्या कम्युनिस्ट संघटनांपुढे उभा केला!

---

# आघाडीवरचा सोनचाफा

एखाद्या म्युझियममध्ये आपण जातो. तिथं आपल्या काळातलं टेरीन, स्टेनलेस स्टील, प्लास्टिक नसतं; पुरातन काळातलं भूर्जपत्र, ताम्रपट, लोहगोल असं काही तरी असतं. त्यावरची लिपी, अक्षरं, नक्षी–एकूण कोरीवकाम–स्पष्ट असतंच. सारं समजतंच असं नाही; तरीसुद्धा आपण सगळं मनापासून पहात असतो. का ? गतकाळातल्या गोष्टींविषयी आपल्याला कुतूहल असतं हे एक कारण. आणि, काळावर मात करणारं आवाहन–सामर्थ्य त्या गोष्टींतच असतं हे दुसरं कारण. कुतूहलापोटी आपण मागच्या काळात जात असतो; सामर्थ्याच्या जोरावर जुन्या गोष्टी आधुनिक काळात शिरत असतात...एका क्षणी आपली रसिकता व त्या गोष्टींचं रूप यांची गाठभेट होते-रसिकतेच्या स्पर्शानं रूप उज्वल होतं; रूपाच्या दर्शनानं रसिकता उल्हसित होते...मग सबंध म्यूझियमच आनंदनिधान वाटू लागतं.

कॅप्टन गोपाळ गंगाधर लिमये यांच्या निवडक कथा वाचताना असाच अनुभव येतो. पॉप्युलर प्रकाशनने प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात श्री. लिमये यांच्या ज्या कथा आहेत त्या मुख्यत: १९२२–१९२९ या काळातल्या – म्हणजे आजच्या हिशेबानं चाळीस–पन्नास वर्षांपूर्वीच्या. अलीकडे विनोदी लेखन करणाऱ्या किंवा आरोग्यविषयक लेखनाकडे लक्ष असणाऱ्या लेखकांच्या अर्धशतकापूर्वीच्या कथा कशा असतील ही जिज्ञासा असतेच ! शिवाय, या कथांतून, त्यांच्या निमित्तानं, पाच दशकांपूर्वीच्या मराठी कथेचं दर्शन कोणत्या रूपात घडेल हीदेखील जिज्ञासा असते ! आणि कथा वाचू लागल्यावर, रुळलेल्या मार्गावरून जाताजाता चाकोरी सोडू पाहणारी, नवी वाट काढू पाहणारी कथा दिसू लागते; रोकड्या वास्तवाकडे वळलेली, वास्तवाचं रोखठोक चित्रण करू लागलेली कथा दिसून येते...

१९२४ साली 'अंतरपाटापासून सप्तपदीपर्यंत' अशी मर्यादशील चाल चालणारी लिमयांची कथा, १९२९ साली 'तोफेच्या तोंडी' बेगुमानपणे चढताना दिसते. 'प्रेम आणि पातिव्रत्य' (मेकॅनो) या विषयांभोवती प्रदक्षणा घालणारी ही कथा, अवघ्या तीन-चार वर्षानंतर, मेसापोटेमियामध्ये 'जमादारसाहेबां'च्या मागोमाग खंदकात खुशाल उडी टाकते. माजघराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडलेली लष्करी पलटणींच्याबरोबर रणांगणावर फेरफटका मारून आलेली लिमयांची कथा स्वाभाविकपणेच चित्तवेधक ठरते. काहीशा काळसर, बऱ्याचशा लालसुर्ख, अशा तिच्या कांतीनं चित्त वेधून घेतलं नाही तरच नवल ! लिमयांच्या कथेतला पालट, त्यामागचा जिवंतपणा पाहून विस्मय वाटतो. मनात येतं की प्रगल्भतेला पोषक ठर-

शारी निकोप प्रकृती या कथेला कशी लाभली ?...

निकोप प्रकृतीचा, प्रगल्भतेचा प्रत्यय कथा संघटनेतून येतो ... लिमये एकएक घटना ठसठशीत रूपात पुढे ठेवतात; पण उगीच गडदपणा कुठंही येऊ देत नाहीत. स्वतः भावविवश न होता, भावक्षुब्ध क्षणांचं चित्र एका फटकाऱ्यात ते सहज करतात–उदाहरणार्थ–काडकन फांदी मोडली, त्याच्या छातीत गोळी घुसली–याप्रमाणे कळवळयाच्या पाशात न सापडता, असंअसं घडलं असं सांगून ते मोकळे होतात. खटक्यात ताडकन तुकडा ! कधी कधी मिश्किलपणे घटनांकडे पाहतात, त्यावर तिरकस रीतीनं खोचक भाष्य करतात. परंतु बहुधा, अशा भाष्यांच्या भरीला न पडता, घटनेमागून घटना कोणती कशी घडली, हे शांतपणे, थंडपणे नुसते सांगत जातात. यावेळी ते अगदी 'डिस्पॅशनेट' असतात ! नियतीनं मारलेले विपरीत तडाखे, बारीकसारीक गोष्टीत होणारे अपेक्षाभंग यांचं वर्णन करताकरता, त्यातून दैवाच्या खेळी, हुलकावण्या यांची जाणीव ते विनासायास करून देतात. जीवनाची आंतरसालच ते उघडी करून दाखवीत आहेत, जीवनाकडे कसं पहावं याचं 'परस्पेक्टिव्' च ते देत आहेत, असं वाटतं. केवळ समकालीनच नव्हे तर कालाबाधित अशा खऱ्याखुऱ्या जीवनाला चहूबाजूंनी भिडण्याची ताकत लिमयांच्यात भरपूर आहे, असंच मग म्हणावं लागतं.

इथं असं जर कुणाच्या मनात आलं की लिमये फक्त बाह्य जगातल्याच घटना पाहू शकतात तर ते चूक ठरेल. मनाच्या आतल्या-जगातल्या उलथापालथी, चळवळी ते बारकाईने पाहू शकतात. कितीतरी ठिकाणी मनाचे गुंतागुंतीचे व्यापार त्यांनी कौशल्यानं उकलून दाखविले आहेत. पन्नास वर्षापूर्वीची ही 'आर्टिस्टिक् सर्जरी' पाहून आश्चर्य वाटतं ! आणि मनाचं प्रतिबिंब लिमये एखाद्या 'प्रतिमे'तून (प्रतिमेतूनच, उपमेतून नव्हे.) दाखवितात, तेव्हा तर फारच आश्चर्य वाटतं ! हें एक उदाहरण–'एखादी जोराची लाट आली म्हणजे किनाऱ्यावरील वाळूतील शिंपले दिसेनासे होतात; लाट ओसरली म्हणजे ते पुन्हा दिसू लागतात. तद्वत् लग्न ठरण्याच्या आनंदातिशयात तो ते भविष्य विसरला होता. पण सुखाचा लोट ओसरल्यावर अकस्मात् त्याला ते भविष्य आठवलं. त्या फुटक्या शिंपल्या व माशांची हाडं सरसर सरकलेली ऐकू आली.' या (किंवा अशा आणखी काही) प्रतिमा येतात, त्या काहीतरी 'एक्स्प्रेस्' करण्यासाठीच; 'इम्प्रेस्' करण्यासाठी नव्हे !

अलंकरणाचा सोस लिमयांना नाही; सजावटीसाठी जिवाचा आटापिटा ते करीत नाहीत. प्रयत्नपूर्वक केलेल्या ठाकठिकीच्या रचनेचा अभावच ! किंबहुना बेफिकिरी, बेदरकारपणाच जास्त ! कथांचे शेवटही ते अनेकदा अर्ध्यावरच सोडून देतात. बाळबोध वाचकांना गोष्ट भरवण्याच्या फंदात न पडता, ती त्यांना पुरी करायला–म्हणजे आधी पचवायला–लावणं हे धाडसच ! लिमयांची एकूण कथाच धाडसी, दणकट ! ती नाजुक भावांना पारखी नाही; परंतु कोवळिकीचं नसतं

कौतुकही तिला नाही. या दृष्टीनं, 'आघाडी टळली, पण –' व 'सखा सोनचाफा' या दोन कथा प्रातिनिधिक मानता येतील. या कथा वाचल्यावर सारखी रुखरूख लागून राहते की, लिमयांनी अशा आणखी कथा पुढे का लिहिल्या नाहीत? लिहिल्या असत्या तर मराठी कथा कुठल्या कुठं गेली असती!

परंतु, काय झालं असतं, ह्या विचार करण्यात काहीच हशील नाही. काय झालं– काय आहे, हें तरी मराठी वाचकांना–अभ्यासकांना धड ठाऊक आहे का? आहे असं वाटत नाही. म्हणूनच, मराठी कथेची 'किस्मत' पालटणाऱ्या लिमयांच्या कथांचं साक्षेपी संपादन श्री. राम कोलारकर यांनी जे केलं आहे, त्याचं स्वागत केलं पाहिजे. 'जीवनातील अपरिहार्यतेचं निर्मम दर्शन घडवणाऱ्या' लिमयांच्या कथांविषयी प्रस्तावनेत कोलारकरांनी फार मार्मिक विचार व्यक्त केले आहेत, युरोपियन भाषांतील असंख्य कथा वाचून कोलारकरांना विशाल दृष्टिकोन प्राप्त झालेला आहे; त्यामुळे ते जेव्हा, 'मॉपसां, चेकोव्ह व ओ–हेन्री या तिघांच्याही प्रकृतिधर्मांचं मिश्रण करून काळानं एक त्रिमूर्ती लिमयांच्या रूपानं मराठीला दिली' असं वजनदार विधान करतात, तेव्हा खरोखरच मननाची नितांत आवश्यकता वाटू लागते.

एका मातब्बर कथाकाराची उपेक्षा आजवर झाली, त्याच्यावर अन्याय झाला, हे कोलारकरांचं म्हणणं खरं असलं तरी, लिमये हे मराठी कथेचे जनक असं प्रतिपादन करताना, त्यांनी धरलेला आग्रह रास्त आहे, असं म्हणता येईल का? असा आग्रह धरल्यामुळे, एकाला न्याय मिळवून देताना, दिवाकर कृष्णांसारख्या दुसऱ्या कथाकारांवर अन्याय तर होत नाही ना? या प्रश्नांचा फैसला घाईनं करून चालणार नाही. काही इतर प्रश्न अगोदर निकालात काढावे लागतील–जनक म्हणजे काय? कोणत्या प्रकारच्या कथेचे जनक? तो विशिष्ट प्रकार ह्याच सर्वश्रेष्ठ का मानायचा? वेगवेगळ्या क्षेत्रात, निरनिराळ्या प्रकारात, आपापल्या परीनं निर्मिती करून सगळेजण मिळूनच साहित्यात भर घालत असतात ना? – हे प्रश्न अटीतटीनं निकालात काढणं बरं नाही!

उपवनात अनेक वृक्षवल्लरी असतात. इरीशिरीनं त्यांना तोडून सुटं करण्यानं काय साधेल? उलट, एकमेकांच्या मेळात त्यांना पाहून त्यांचं व उपवनाचं सौंदर्य न्याहाळणंच रसिकत्वाचं नाही का?... या दृष्टीनं मराठीतल्या बिनीच्या कथाकारांकडे मी पाहतो. तेव्हा इतरांच्या बरोबरीनंच कॅप्टन लिमयेही लक्ष ओढून घेतात–आघाडीवरच्या सोनचाफ्यासारखे! सोनचाफ्याचा स्वाद भ्रमर घेत नाहीत, असं म्हणतात. लिमयांच्या कथांचा रसास्वाद घेणारेही कुणी आजवर लिमयांना लाभले नाहीत–त्यांचं अनुसरण करणारे समानधर्मे तर नाहीतच नाहीत. आघाडीचे दमदार कथाकार असूनही अशी स्थिती! म्हणून ते सोनचाफ्यासारखे वाटतात.

– चंद्रशेखर बर्वे

# संपादक माणूस
# सप्रेम नमस्कार

आपल्या दि. २३-९-७० च्या अंकातील श्री. विलास जोशी यांनी घेतलेली 'नवे मित्र-नव्या ओळखी' ही मुलाखत वाचली. ती वाचून ज्या काही शंका मनात आल्या त्या कळवित आहे.

एका तरुणाने फ्रेंच पाहुण्यांची घेतलेली मुलाखत' असं तिचं स्वरूप असावं. वास्तविकत: अशा मुलाखतीत पुष्कळसा मोकळेपणा हवा. दुर्दैवाने असा प्रयत्न झालेला दिसत नाही. जे जे भारतीय आहे त्या सर्वांची (मग ते सदोष का असेना) श्री. जोशी जणू काही तरफदारी करीत आहेत—बचाव करीत आहेत—असा भास सर्व लेखात होतो. त्याची उदाहरणे मी खाली देतच आहे. फ्रेंच पाहुण्यानी केलेलं संभाषण अधिक मोकळेपणाचं वाटतं. श्री. जोशींनी लपवालपवी (निष्कारण) आणि बचाव करण्याचा प्रयत्न करताना जी उत्तरं दिली आहेत ती अर्थातच सदोष आहेत. काही महत्त्वाचे नमुने मी देत आहे. उदाहरणार्थ—

१ : कॅट्रीन: 'भारतीय तरुणी कमालीची लाजाळू व आत्मकेंद्रित दिसली. ती अजून रूढीबंधनात अडकून पडली आहे.'

श्री. जोशी : 'कारण आमची भारतीय संस्कृती स्त्रियांच्या या वागणुकीतच सामावलेली आहे.'

मला असं वाटतं की श्री. जोशी यांनी असं म्हटलं नसतं तर बरं झालं असतं. कमालीच्या लाजाळू, आत्मकेंद्रित आणि रूढीबंधनात अडकलेल्या स्त्रीचा आणि भारतीय संस्कृतीचा काय संबंध आहे? जर तसा असेल तर भारतीय संस्कृतीचा स्त्रीविषयक दृष्टिकोन हास्यास्पद आहे असंच म्हणावं लागेल. बरं, एवढं म्हणूनही श्री. जोशी थांबले नाहीत. त्यांनी त्यापुढे जे म्हटलं ते अधिकच मजेदार आहे.

श्री. जोशी : 'पाश्चात्य स्त्रियांसारखे स्वैर वागणे शक्य होणार नाही.'

या ठिकाणी श्री. जोशींनी एक परिचित गृहीत धरलं आहे. ते म्हणजे पाश्चात्य स्त्रिया स्वैर वागतात आणि भारतीय स्त्रिया संयमी आणि नीतीसंपन्न असतात. एखाद्या व्यक्तीला संयमी केव्हा म्हणायचं? जर त्या व्यक्तीला एखादी गोष्ट करण्यास भरपूर वाव असूनही जर ती संयमाने ती गोष्ट टाळत असेल तर. या दृष्टिकोनातून भारतीय स्त्री संयमी आहे का? आज तिला रूढींनी एवढं बांधून टाकलं आहे की तिला हालचालच करता येऊ नये. अशा स्त्रीच्या दृष्टिकोनातून श्री. जोशी पाश्चात्य स्त्रीला स्वैराचारी ठरवतात. असं म्हणणं म्हणजे गजाआड डांबून ठेवलेल्या व्यक्तीने बाहेर स्वच्छंदाने वावरणाऱ्या व्यक्तीला स्वैराचारी ठरवण्यासारखंच आहे. शिवाय पाश्चात्य समाजात चाललेल्या ज्या लैंगिक वर्तनाला आपण 'स्वैराचार' म्हणतो तो खरोखरच स्वैराचार आहे का याचाही विचार श्री. जोशींनी केलेला दिसत नाही.

२ : प्रश्न : 'संस्कृत शिकणाऱ्याला मांस व दारू वर्ज का?'

श्री. जोशी : 'त्याचे असे आहे, दारू व मांसभक्षणाने आपली जीभ जड होते व त्यामुळे जोड शब्दाचा उच्चार करणे जड जाते.'

या ठिकाणी दिलेलं उत्तरही असंच अप्रस्तुत आहे. दारूचे परिणाम जीभ जड होण्यात होत असावेत. (त्याबद्दलही मला शंका आहे) पण मांसभक्षणाने आपली जीभ जड होते हे मात्र खरं नाही. याला शरीरशास्त्राचाही कोणता आधार असेल असं वाटत नाही. त्यामुळे पोथ्यापुराणातून 'बाबावाक्यं प्रमाणम्' या न्यायाने आलेलं वाक्य इतकंच त्याचं महत्त्व (?) उरतं.

३ : पाहुणे : 'मात्र एकंदरीत ते (भारतीय विद्यार्थी) नम्र व मदत करण्यास उत्सुक दिसले'

श्री. जोशी : 'मग या बाबतीत आमचे वेगळेपण नक्कीच जाणवले असेल'

जव्हा एखादा परदेशी मनुष्य आपल्या देशात येतो तेव्हा सामान्यतः माणसं त्याच्याशी नम्रतेने वागतात आणि त्याला मदतही 'उत्सुकतेने' करतात हे सगळीकडेच आढळतं. ती मनुष्यवृत्ती आहे. जेव्हा पाहुणे म्हणतात की, 'एकंदर वागणुकीत' ते नम्र व मदत करण्यास उत्सुक दिसले याचाच अर्थ सर्वसामान्यतः ज्या वागण्याची अपेक्षा होती त्याप्रमाणे भारतीय विद्यार्थी वागले. याखेरीज काही वैशिष्ट्य भारतीय विद्यार्थ्यांजवळ आहेत असं मला स्वतःला तरी वाटत नाही.

४ : लेखाच्या शेवटी श्री. जोशी म्हणतात, 'आपण बऱ्याच चांगल्या वाईट गोष्टी बोललो, समजावून घेतले. आता शेवटची विनंती आहे की जेव्हा आपण फ्रान्सला परत जाल तेव्हा येथील ज्या चांगल्या गोष्टी समजल्या तेवढ्याच सांगा. आपण गैरसमज पसरवणार नाही अशी खात्री वाटते.'

यातील 'गैरसमज पसरवू नका' हे म्हणणं खरोखरच अर्थपूर्ण आहे. परंतु समजलेल्या गोष्टींपैकी फक्त चांगल्याच सांगा हे म्हणणे मात्र विचित्र आहे. अशी

फोल अपेक्षा श्री. जोशींनी का करावी हेच समजत नाही. 'आमच्याही समाजाचे अनेक दोष आहेत पण त्यांची आमच्याशी चर्चा व्हावी. तसंच केवळ दारिद्रयाची व दोषांची बाजू आपल्या बांधवांसमोर न मांडता भारताने साधलेल्या प्रगतीचीही त्यांना कल्पना देण्यात यावी' असा दृष्टिकोन श्री. जोशींनी मांडला असता तर ते समजू शकलं असतं. याखेरीज इतरही अनेक मुद्दे आहेत. उदा. निसर्गाने माणसाला मूलतःच शाकाहारी बनविलं आहे असं श्री. जोशी आपल्या मांसाहार-विषयक चर्चेत म्हणतात. याला कोणता आधार आहे ?

सांगण्याचा मुद्दा असा की जोपर्यंत हे सर्व फक्त पाहुणे आणि श्री. जोशी यात चालतं तेव्हा काही गोष्टी खपून जाऊ शकतात. पण 'माणूस'सारख्या नियत-कालिकात जेव्हा ते छापलं जातं तेव्हा वाचकांच्या विचारसरणीवर त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम होत असतो. आणि म्हणून लेखकावर अधिक जबाबदारी पडते. म्हणून अशा प्रकारच्या मुलाखती अधिक तर्कशुद्ध, अर्थपूर्ण आणि गैरसम-जुतींचं निराकरण करणाऱ्या असाव्या. त्यात प्रतिनिधित्वाची भावना असू नये व केलेली चर्चा व आपण दिलेली उत्तरं पाहुण्यांना विश्वसनीय वाटावीत.

'माणूस'चा लेखकवर्ग व संपादकवर्ग याचा नक्की विचार करील अशी आशा वाटते.

आपला,

**अ. के. राजवाडे**

आय. आय. टी. पवई

## सप्रेम नमस्कार

श्री. राजवाडे यांच्या शंकेविषयी उत्तर :

१ : श्री. राजवाडे यांनी मुलाखतीतील शब्दांचा 'कीस' न काढता सरळ अर्थ लक्षात घेतला असता तर एवढा वैचारिक गोंधळ व्हायचे कारण नव्हते.

मुलाखतीच्या सुरुवातीलाच अनौपचारिक आणि दिलखुलास चर्चा करण्याविषयी ठरले असल्याने 'पुण्याचे हवापाणी कसे आहे?' असल्या प्रश्नांना फाटा दिला आहे. तेव्हा 'आणखी मोकळेपणा म्हणजे कोणता?' शिवाय सर्वच ठिकाणी भारतीयांची तरफदारी केली हे चूक आहे. श्री. ब्रेबिअन यांनी हल्लीच्या भारतीय तरुणांच्या जीवनविषयक दृष्टीकोनाविषयी मांडलेले विचार बिनतोड होते. त्याविषयी कोणतेही प्रत्युत्तर केलेले नाही.

२ : भारतीय संस्कृतीची निश्चित अशी व्याख्या करणे जरा जडच आहे. पण सर्वसाधारणपणे जीवनात संयम, शालीनता, नम्रता यांचे पालन व परंपरेचे रक्षण करणे याला अनुसरून जे केले जाते ते यात मोडते असे मला वाटते. (चुकण्याची शक्यता आहे, नाही असे नाही), आणि सर्वसामान्य भारतीय स्त्रीवर रूढींचा पगडा

किती जबरदस्त आहे हे श्री. राजवाडे पण मान्य करतात. मग त्यादृष्टीने पाहाता भारतीय संस्कृती ही स्त्रियांनीच जपली आहे. सांभाळली आहे. तेव्हा तसा तो संबंध नाही हे श्री. राजवाडे कशाच्या आधारावर म्हणतात ?

३ : 'भारतीय स्त्री ही नीतीमान असतेच' असे मी कुठेही प्रतिपादिले नाही. पण संयमी निश्चित आहे. आता लैंगिक वर्तन हे मनुष्याच्या जीवनाचे अंग आहे. पण त्याचे 'प्रदर्शन' करणे याला स्वैराचार म्हणतात असे मला वाटते. स्वैराचाराची आणखी कोणती गोष्ट श्री. राजवाडे यांना अभिप्रेत आहे ते कळायला मार्ग नाही.

४ : दारू आणि मांस यांचे सेवन करण्यास बंदी नव्हती हे मान्य. परंतु त्याचवेळी 'संस्कृतमधून वेद म्हणणाऱ्याला व केवळ बुद्धीबलावर अवलंबून असणाऱ्याला रोजच्या जीवनात जी पथ्ये सांगितली आहेत त्यात हे मोडते. कारण दारूमुळे मनाची एकाग्रता ढळते व साहजिकच त्याचा वाणीवर परिणाम होतो. आणि मग त्यामुळे 'जीभ जड होते' याचा हा अर्थ होत नाही काय ? अर्थात शरीरशास्त्राच्या दृष्टिकोनातून या विषयाकडे पहाणे हा स्वतंत्र संशोधनाचा विषय होईल.

५ : प्रत्येक परदेशी माणसाबरोबर भारतीय लोक नम्र व मदततत्पर असतात हे सुद्धा श्री. राजवाडे यांचे गृहीत आहे. पण त्याचवेळी अशा प्रवाशाची असहाय्यता लक्षात घेऊन त्याला फसवणारे कमी नसतात. गेल्या महिन्यात रविवारच्या 'महाराष्ट्र टाईम्स'मध्ये आलेल्या परदेशी विद्यार्थ्यांच्या मुलाखती जर वाचल्या तर माझा मुद्दा अधिक स्पष्ट होईल. आणि त्यामुळे हे 'फ्रेंच लोकांना जाणवलेले वेगळेपण' श्री. राजवाडेंना वैशिष्टयपूर्ण वाटत नाही याला नाईलाज आहे.

६ : भारतीय समाजाविषयी, देशाविषयी परदेशात गैरसमज पसरवण्याचे कार्य अनेक संस्था (उदा. B B. C. सारख्या) वा लोक करत असतात तेव्हा त्यात भर न पडता 'ज्या गोष्टी चांगल्या समजल्या त्याच सांगा' अशी अपेक्षा केल्यास चूक काय ?

शेवट शब्दांचा फरक करून श्री. राजवाडे यांनी तोच अर्थ मांडला आहे.

उलटपक्षी मी म्हणेन की, चांगल्या गोष्टींबरोबर वाईट गोष्टीही सांगा अशी श्री. राजवाडे का अपेक्षा करतात ? हे विचित्र नव्हे का ?

आपला भारत दरिद्री आणि गरीब असला तरी ते आपण झाकून घ्यायचे का आपणहून उघडे करायचे ? हा प्रश्न आहे.

तेव्हा मला एवढेच म्हणायचं आहे की शब्दाचे खेळ करून भांडवल गोळा करण्यापेक्षा अर्थ लक्षात घेतला असता किंवा माझ्या अज्ञानाचे परिमार्जन योग्य दाखले देऊन केले असते तर ते आनंदाने मान्य केले असते. अन्यथा एक चिखल उडविण्याचा खोडसाळपणा एवढेच त्याला महत्त्व उरते.

विलास जोशी

स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरील

# फिजी बेटसमूह

सुभाष सोनवणे

येत्या १० ऑक्टोबरला सकाळी ठीक १० वाजता प्रशांत महासागराच्या नैऋत्य भागातील प्रवाळ खडकाच्या ८४४ बेटसमूहांवर आनंदाचे उधाण येणार आहे. यावेळेस या बेटसमूहांवरील ब्रिटिशांचा युनियन जॅक खाली उतरविण्यात येईल. या बेटसमूहांवरील सुमारे ५ लाख लोक पारतंत्र्याच्या शृंखलातून मुक्त होऊन स्वतंत्र होतील व या दिवशी खऱ्या अर्थाने 'सीमोल्लंघन' साजरे करतील.

अद्याप जगातील कोट्यावधी लोक पारतंत्र्याचे–परवशतेचे जिणे जगत आहेत. या दुर्दैवी लोकांपैकी ५ लाख लोकांच्या जीवनात स्वातंत्र्याची पहाट उगवणार ही मानवतेच्या दृष्टिकोनातून निश्चितच स्वागतार्ह घटना आहे. परंतु याखेरीज आपणास अधिक आनंद व्हावा असेही एक कारण आहे. नि ते म्हणजे या बेटसमूहावरील निम्म्यापेक्षा अधिक लोक–आमच्याच रक्तवंशाचे–भारतीय आहेत. या बेटसमूहाचे नाव आहे 'फिजी!'

गेल्या शतकाच्या शेवटच्या दोन तीन दशकात ब्रिटिशांनी आपल्या निरनिराळ्या वसाहतींमधील मळ्यांमध्ये, शेतात काम करण्यासाठी लाखो भारतीयांना यथून नेले. ते तेथे स्थायिक झाले. आपले श्रम, घाम व रक्त आटवून आमचे भारतीय लोक त्या त्या वसाहतीत सुस्थिर झाले. परंतु अलीकडच्या काळात आफ्रिकेतील काही देशातून, सिलोन, ब्रह्मदेश या देशांमधून लाखो भारतीयांना हुसकावण्यात आले. त्यांच्याविषयींची भारत सरकारची अनास्था व उपेक्षा महाभयंकर आहे. त्याचप्रमाणे ज्या बेटसमूहावर २ लाखापेक्षा अधिक भारतीय आहेत, त्या फिजी बेटसमूहांविषयी आमच्याकडे अज्ञानच फार आहे.

फिजी देश हा ८०० पेक्षा अधिक बेटसमूहांचा बनला असला तरी त्यातील फक्त १०० बेटांवर लोकवस्ती आहे. विटी लेवु व वानुअ लेवु ही सर्वांत मोठी

दोन बेटे आहेत. फिजी देश हा एकूण ७,०९५ चौ. मैलाचा भूप्रदेश. त्यापैकी विटी लेवू हे बेटच ४,१०९ चौ. मैलाचे आहे. वानुअ लेवु हे बेट २,२४२ चौ. मैलाचे आहे. फिजो बेटसमूहाच्या उत्तरेस सुमारे ४०० मैलावर असलेले १८ चौ. मैलाचे रोतुमा नावाचे बेट हे फिजी बेटसमूहावरच अवलंबून आहे.

फिजी बेटसमूहाची राजधानी आहे सुवा नावाचे शहर. या बेटसमूहाचे ते प्रमुख बंदर आहे. या बेटसमूहावरील बहुतेक बेटे ही ज्वालामुखीतून निर्माण झालेली आहेत. या बेटांवर कोठेही जिवंत ज्वालामुखीचे अस्तित्त्व जाणवत नाही. परंतु कोठे कोठे मधूनच सुप्त ज्वालामुखी धगधगताना, खदखदताना दिसतो. तसेच या बेटांवर साधारण उंचीची पर्वतराजीही (Mountain Range) दिसते. तिची वाढती कमान जास्तीत जास्त ४,३४१ फूट एवढी उंच आहे.

मे–ऑक्टोबर या महिन्यात व्यापारी वाऱ्यांमुळे या बेटावर थंड हवामान असते. उर्वरित काळात मात्र हवामान बदलते असते. केव्हा केव्हा वादळेदेखील होतात. या बेटांवरील पर्वतराजीचा भाग वगळता, इतर भागात तपमान हे क्वचितच ९०° फॅरनहाईट (३२° सेंटीग्रेड) पर्यंत जाऊन थडकते. तसेच ३०° फॅरनहाईट (१६° सेंटीग्रेड) च्या खाली ते क्वचितच कोसळते. पर्जन्यमानातही थोडी तफावत आहे. सुवा या राजधानीच्या शहरी १२० इंच पाऊस पडतो तर विटी लेवु बेटावर ७४ इंच पाऊस पडतो.

फिजी बेटसमूहावरील लोकसंख्येचा अगदी अलीकडचा अंदाज उपलब्ध नाही. परंतु १९६२ अखेर या बेट समूहाची लोकसंख्या ४ लाख २७ हजार ८५१ एवढी होती. या लोकांची त्यांच्या मूळ देशानुसार वर्गवारी अशी आहे–

| | |
|---|---|
| भारतीय | २,१२,८२९ |
| फिजीअन्स | १,७७,७७० |
| प्रशांत महासागराच्या इतर बेटांवरील | १२,१७९ |
| युरोपिअन्स | १०,५५३ |
| पार्ट युरोपिअन्स | ९,२२६ |
| चिनी | ५,१७७ |
| इतर | ११७ |
| एकूण | ४,२७,८५१ |

या बेटसमूहावरील लोकांच्या धर्माबाबत १९५६ च्या जनगणनेत उपलब्ध असलेल्या माहितीनुसार, ५१·५ टक्के लोक ख्रिश्चन धर्माचे आहेत. (त्यातही पोटभेद लक्षात घेता, ४० टक्के मेथॉडिस्ट व ८ टक्के रोमन कॅथॉलिक आहेत) हिंदु लोक ३९·७ टक्के आहेत तर मुस्लीम ७·३ टक्के आहेत.

या बेटांवर फिजीअन, हिंदुस्थानी व इंग्लीश ह्या भाषा बोलल्या जातात.

१९५६ च्या जनगणनेप्रमाणे, या बेटसमूहाची राजधानी असलेल्या सुवाची लोक-संख्या त्या वर्षी ३७,३७१ एवढी होती. याखेरीज लाऊटोका नावाचे शहर साखर कारखान्यांचे केंद्र, वाटुकौल नावाचे सोन्यांच्या खाणीचे शहर, म्बा (Mba), लम्बासा, नौसोरी ही महत्त्वाची शहरे या बेटसमूहावर आहेत. ८५ टक्के लोक खेड्यात राहतात.

या बेटावरील मूळचे फिजीअन लोक हे मेलॅनेशियन वंशाचे आहेत. परंतु त्यांच्यातील बऱ्हंशी लोकात पॉलिनेशियन रक्ताचे मिश्रण झालेले दिसते.

## पूर्वेतिहास

फिजी समूहबेटांवर स्वातंत्र्यासाठी अलीकडे झालेले प्रयत्न, भिन्न वंशाच्या लोकांमध्ये परस्परांबद्दल असलेला संशय व भीती, याविषयी विचार करण्यापूर्वी या बेटसमूहांचा संक्षिप्त पूर्वेतिहास लक्षात घेणे उचित ठरेल. इ. स. १६४३ मध्ये तास्मानियन व डच दर्यावर्दी प्रशांत महासागरातून प्रवास करीत असता या बेटांवरील लोकसमूहाकडे त्यांचे प्रथमच लक्ष गेले. परंतु ते या बेटांवर उतरले नाहीत. इ. स. १७७४ मध्ये कॅप्टन कुकने वॅटोअ नावाच्या बेटास भेट दिली. इ. स. १८७४ मध्ये हे बेटसमूह प्रथमच ब्रिटीशांच्या अंमलाखाली आले. याच वर्षाच्या विभक्त करारनाम्यानुसार, मूळच्या फिजीअन लोकांना जमिनीची हमी देण्यात आली.

येथील साखरेच्या मळ्यात काम करण्यासाठी ब्रिटीशांनी इ. स. १८८० नंतर भारतामधून हजारो लोकांना या बेटावर आणले. भारतीयांचा जननक्षमतेचा वेग इतर वंशाच्या लोकांपेक्षा अधिक असल्यामुळे मूळ फिजीअन लोकांपेक्षा भारतीयांची संख्या बरीच अधिक झाली आहे. भारतीयांना करारानुसार येथे आणले होते. परंतु १९१७ मध्ये हा करार रद्द झाल्यानंतर भारतवासीय येथेच स्थायिक झाले. भारतीयांना लेजिस्लेटीव्ह कौन्सिलमध्ये आपले निर्वाचित प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क १९२९ मध्ये मिळाला. तर भारतीयांना फिजीअन्स व युरोपियन्स यांच्या इतकेच प्रतिनिधित्व या विधिमंडळात १९३७ साली मिळाले.

## भीतीपोटी स्वातंत्र्याला विरोध

या बेटसमूहाला स्वातंत्र्य मिळावे यासाठी येथील मूळचे भारतीय लोक कित्येक वर्षांपासून चळवळ करीत होते. परंतु स्वातंत्र्यानंतर भारतीयांचे प्रभुत्व, वर्चस्व वाढेल ही भीती मूळच्या फिजीअन लोकांच्या मनात होती. त्यामुळेच त्यांनी १९६४ मध्ये स्वातंत्र्यास विरोध केला. भारतात १९१० च्या मिंटो–मोर्ले सुधारणा लागू करण्यात ‘फोडा आणि राज्य करा’ हा दृष्टिकोन होता. याच दृष्टीकोणाने ब्रिटीश येथील मूळच्या फिजीअन व भारतीयात फूट पाडीत होते.

यावर्षी २० एप्रिलला लंडनला ‘घटना परिषद’ भरली. या परिषदेस बेटसमूहावरील मूळच्या फिजीअन लोकांच्या सत्ताधारी पक्षाचे मुख्यमंत्री श्री. रातु के. के. टी. मारा यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधीमंडळ व मूळच्या भारतीयांच्या ‘इंडियन

नॅशनल फेडरेशन पार्टी 'चे प्रतिनिधीमंडळ श्री. एस. एम. कोया यांच्या नेतृत्वाखाली उपस्थित होते. प्रत्येक प्रौढ नागरिकाला मतदानाचा अधिकार ही मुळच्या भारतीयांची मागणी भीतीने व राजकीय कारणानेच फेटाळण्यात आली. याबाबत अधिक ताणून न धरण्याचे व वंशविद्वेषाची कटुता वाढू नये यासाठी भारतीयांनी पत्करलेले समंजस धोरण त्यांच्या व्यवहारीपणाची साक्ष देते.

स्वातंत्र्य मिळाल्यावर या बेटसमूहावर लौकरच सार्वत्रिक निवडणुका होणार आहेत. त्यानंतर नियुक्त केले जाणारे रॉयल कमिशन देशास कोणती निर्वाचपद्धती योग्य आहे याबाबत आपले मत देईलच.

फिजी बेटसमूहांना येत्या १० ऑक्टोबरलाच स्वातंत्र्य देण्याचे ठरविण्यास कारण आहे. ते म्हणजे याच तारखेला ९६ वर्षांपूर्वी हा बेटसमूह प्रथमच इंग्रजांच्या ताब्यात आला. फिजी बेटांच्या स्वातंत्र्य समारंभास एलिझाबेथ राणीच्या वतीने प्रिन्स चार्लस् हे उपस्थित राहणार आहेत. या बेटसमूहावर येत्या १० आक्टोबरला सकाळी ठीक १० वाजता सर्वत्र नवा ध्वज डौलाने फडकू लागेल. स्वातंत्र्यदिनानिमित्त फिजीमधील प्रत्येक मुलाला पदक देण्यात येईल.

या प्रसंगाच्या निमित्ताने ' सुवा इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सने 'ही उल्लेखनीय कार्यक्रम हाती घेतला आहे. (१) फिजी बेटसमूहांच्या पंतप्रधान निधीसाठी भारतीय व्यापारी जमातीकडून निधी गोळा करणे. (२) सुवामध्ये या प्रसंगाच्या स्मरणार्थ ' क्लॉक टॉवर ' उभारणे. (३) फिजी बेटांना स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सुवाच्या सर्वात मोठ्या इस्पितळात प्रथम जन्माला येणाऱ्या मुलास ५१ डॉलरचे बक्षीस.

आनंदाच्या या क्षणाच्या स्मरणार्थ या बेटसमूहाचा भूतकाळ, वर्तमानकाळ व भविष्यकाळ चित्रित करणारी पोस्टाची चार खास तिकीटे काढण्यात येणार आहेत.

आर्थिक मदतीसाठी या बेटसमूहाच्या प्रतिनिधीमंडळाने १९६१ च्या सुरुवातीला भारतास भेट दिली होती.

## मूलभूत आर्थिक समस्या

फिजी अर्थव्यवस्थेच्या आर्थिक समस्या ह्या मूलभूत आहेत. या बेटसमूहावरील सर्व लोकांचे जीवनमान सुधारल्याशिवाय वंशविद्वेषातून होणारी तंग परिस्थिती संपूर्णपणे निवळणार नाही. तसेच राजकीय स्थैर्यही लाभणार नाही. कृषिप्रधान असलेल्या या बेटसमूहाच्या अर्थव्यवस्थेची मुख्य पिके ऊस व कोकोनट ही आहेत. फिजीच्या एकूण निर्यातीमधे या दोन पिकांचा वाटा ९० टक्के आहे.

ही बेटे खनिज संपत्तींनी समृद्ध आहेत. त्यामुळे विविध प्रकारचे उद्योगधंदे सुरू करणे शक्य आहे. मात्र त्यासाठी बड्या विकसित देशांनी व शेजारच्या विकसनशील देशांनी या बेटांवर आर्थिक गुंतवणूक केली पाहिजे. या परिसरातील फिजी देशाचा थोरला भाऊ ऑस्ट्रेलिया आहे. फिजीमधील व्यापारात ऑस्ट्रेलियन लोकांचा वर-

चष्मा आहे. न्यूझीलंडसारख्या छोट्या देशानेही या बेटांच्या विकासकार्यक्रमाबाबत सक्रिय आस्था दाखविली आहे.

फिजीमध्ये तांदूळ, दूधदुभते व भाजीपालाही होतो. फिजीच्या निर्यातीमध्ये सोने, कच्चे मँगेनीज, केळी, खोबरे यांचा अंतर्भाव होतो. ह्या वस्तूंची निर्यात मुख्यत्वे ब्रिटन, अमेरिका, न्यूझीलंड व कॅनडा या देशांना होते.

फिजी बेटसमूहाचे परदेशी लोकांना आकर्षण वाटत असल्यामुळे या बेटसमूहाच्या अर्थव्यवस्थेस पर्यटनापासूनही चांगले उत्पन्न मिळते. १९६७ मध्ये पर्यटनामुळे फिजीला ७० लाख पौंड मिळाले. परंतु केवळ पर्यटनवृद्धीने या बेटसमूहाचा कायापालट होऊ शकेल ही आशा मात्र अनाठायी ठरेल. कारण पर्यटनामुळे जसे उत्पन्न मिळते, त्याप्रमाणेच समस्याही निर्माण होतात. अत्याधुनिक हॉटेले उभारण्यासाठी आधीच प्रचंड गुंतवणूक करावी लागते. त्याप्रमाणे चांगले रस्ते तयार करावे लागतात.

## प्रचंड सुप्त शक्ती

भारताच्या त्रिसदस्य सल्लागार पथकाने फिजीला गेल्या जुलै–ऑगस्टमध्ये भेट दिली. अन्न व फळफळावळांचे प्रक्रियाकरण, मेटल, कंटेनर्स, नट, बोल्टस्, वॉशर्स, अॅल्युमिनियम, स्टेनलेस स्टीलची भांडी, शेतीउपयोगी अवजारे, वॉटर पंप्स्, जंतुनाशके, कीटकनाशके, काचेच्या बाटल्या, रेडिमेड कपडे व होजिअरी आदी उद्योगधंदे फिजीमध्ये सुरू करावेत असे या सल्लागारपथकाने सुचविले आहे.

फिजीमध्ये केवळ ब्रिटीश नागरीक व ब्रिटीश कंपन्यांनाच तेलाचे साठे कोठे मिळतात की काय यासाठी उत्खनन करण्याचा अधिकार असलेला कायदा होता. हा कायदा या वर्षी जूनमध्ये रद्द करण्यात आला.

फिजीमध्ये भारतीय वस्तूंचे प्रदर्शन (Trade Exhibition) नोव्हेंबरात भरणार आहे असे फिजीमधील भारताचे कमिशनर श्री. ए. पी. वेंकटेश्वरन् यांनी अलीकडेच जाहीर केले आहे.

राजकीयदृष्ट्या फिजीमध्ये दोन्ही वंशाच्या प्रमुख पक्षात स्वातंत्र्य व मतदानपद्धती याबाबत आज तरी दिलजमाई आहे. दुष्काळाच्या भयंकर तडाख्यातून फिजीची अर्थव्यवस्था सावरू लागली आहे. ४ लाख २० हजार डॉलर्स तुटीच्या अंदाजपत्रकाचे रूपांतर ८ लाख डॉलर्सच्या शिलकी अंदाजपत्रकात होईल अशी आशा फिजीच्या अर्थमंत्र्यांनी नुकतीच व्यक्त केली आहे.

९६ वर्षांच्या गुलामगिरीनंतर स्वतंत्र होणाऱ्या फिजी बेटाच्या लोकांचे हार्दिक अभिनंदन! २३ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतर सुबत्ता अद्याप बरीच दूर असल्याचा आपला अनुभव आहे. परंतु फिजीच्या लोकांना स्वातंत्र्यानंतर सुबत्तेचा, सुखसमृद्धीचा लौकरच अनुभव येतो हीच या महन्मंगल क्षणी शुभेच्छा!

◻ ◻ ◻

“ तुझा मुलगा मेला ’ कोरडा तिरसट आवाज.
छान झालं. तो माझा नव्हताच मुळी.
मला काय वाटायचं ?

राजीव एलकुंचवार

# छोटे मासे

“ हा काय तुझा यार भलताच आग्रह ?”

“ पण–, यू मस्ट थिंक ओव्हर इट. ”

“ खड्डयात गेली साली रिता, हे काय भलतंच भूत शिरलंय यार तुझ्या डोक्यात इतक्यात ?... टु से फ्रॅन्कली आय काण्ट–”

मधूला एकदम निराधार वाटतं. आपली एवढीही इच्छा जिवलग म्हणविणाऱ्या मित्रानं पुरवू नये याचं त्याला आश्चर्य वाटतं. पंधरा दिवसांपासून त्याला हे दुःख जाळतं आहे. फेऱ्या मारून ते कमी होणार नाही हे माहीत असूनही तो अर्ध्या तासापासून दिवाणखान्यात फेऱ्या मारतो आहे. आपल्यासारखाच नित्यानेही विचार करायला हवा आहे असे त्याला सारखं वाटते आहे. इतक्या कॅज्युअली त्याने विचार करणं म्हणजे एकपरीने त्याला स्वतःचाच अपमान वाटतो आहे. तो सहज बघतो. चिडतो. अॅक्वेरियम्‌मधले कालच आणलेले चार झुळझुळीत रंगाचे मासेसुद्धा शांत असतात. त्यांनासुद्धा मधूबद्दल विचार करायला फुरसत नसते.

“ बट् व्हाय डोंच्यू ट्रस्ट मी ?”

“ काय पुन्हा तेच ते विचारतोस यार ? माझ्या अजून दोन तृतीयांश जिण्याचा प्रश्न आहे. तुला काय ? म्हणे रिताशी लग्न करा ! दोस्ती गेली उडत. आपण स्वतः तर तिला ठेवलं रडवत आणि आता मला म्हणतोय साला तिच्याशी लग्न कर म्हणून. ‘ व्हाय डोंच्यू ट्रस्ट मी ’ म्हणे ! वा. वा. साल्या, आधी स्वतःला विचार– मी तिच्याशी लग्न केलेलं तुला खरंच आवडेल का ते. फालतू सालं–” नितीन आणखीच रिलॅक्स होतो; कोचातलं आसन एसपैस करीत म्हणतो–“ खरं



सांगू मध्या ? तू स्वतःला एकवेळ थापा मारशील. माझ्याजवळ छटपटी चालणार नाहीत.... आणि तुला सांगतो मी रिताबरोबर लग्न करणे -- तुझ्या स्वप्नात अगदी सहज शक्य असले तरी प्रत्यक्षात केवळ अशक्य आहे कितीही खणलं तरी पाणी लागणार नाही. शिवाय तुझं कोपरही विशेष टणक नाही."

मधूला त्याचा आता मनापासून राग येतो. आतापर्यंत चारदोन वेळा त्याने प्रयत्न केला आहे. पण प्रत्येक वेळी नितीनच्या चारपाच वाक्यातच त्याचा खिमा होतो. आज तसं काही व्हायच्या आतच आपण हातपाय हलवले पहिजेत. खरं म्हणजे तोही वावटळीतच सापडला आहे. रिताशी नित्याचेच लग्न करावे असे आपल्याला कधीपासून वाटायला लागले ? रिता भेटल्यापासून ?... पण हे अगदी असंच व्हायला हवं हे आपल्याला का वाटतं आहे इतक्या प्रखरपणे ? इतक्या आतून ?

अगतिक होऊन तो कोचात बसतो. नित्या आंघोळ करायला गेला आहे.

संध्याकाळी थंडपाण्यानं आंघोळ करायला त्याला आवडतं...आणि . पर्सनॅलिटी काय आहे, राक्षस आहे नुसता. साला काही ऽ स्मार्ट आहे. ही मस्ट मॅरी रितू.... त्याला काही सुचत नाही. डोक्यात मोठं वारूळ झालं आहे आणि एक एक मुंगी डोळ्यातून बाहेर पडते आहे असंच काहीसं विचित्र त्याला वाटत राहतं. मग त्याला स्वतःचं आश्चर्य वाटू लागतं– आपण स्वतः होऊन नित्याला असं सांगूच कसं शकलो याचं. नित्याला असं म्हणणंही हिमतीचंच.

नित्या आंघोळ करून येईपर्यंत मधू बराच मूळ पदावर आलेला असतो. थंड डोक्यानं किल्ला लढवला तर थोडंफार यश मिळेल असं त्याला वाटतं. पण नित्या एकदम समोर येऊन बसल्यावर त्याचे सगळे बेत बारगळतात. भात्यातून भलताच बाण निसटून जातो.

"मी...वेगळं राह्यचं म्हणतो नित्या."

"उगीच त्रास करून घेऊ नकोस यार डोक्याला." नित्या थोडा गंभीर होऊन म्हणतो, "पण शक्यच कसं आहे? उगीच काहीतरी काय म्हणायचं? शिवाय–"

"नाही, नाही." नित्याच्या बोलण्याचा भलताच अर्थ घेऊन भरभर बोलत सुटतो, "यू आर गोइंग क्वाईट रॉंग. अगदी तू आवडशीलच बघ तिला. तुझी पर्सनॅलिटीच अशी आहे की कोणीही भाळून जाईल." पण मध्येच तो थांबतो. त्याला जुन्या आठवणी येतात. रितूनं हजार वेळा म्हणूनही त्यानं एकही वेळा तिला नित्याशी भेटवलं नसतं. खरं तर रिताला त्यानं जपलंच असतं नित्यापासून. त्याची नित्याशी ओळख होती तर कदाचित मधूवर जीव द्यायची पाळी येती. रितूच्या अपेक्षांशी पूर्णपणे जुळणारा नित्या – भक्कम, स्मार्ट, काय करतो हे कुणालाच माहीत नसताना भरमसाठ पैसे मिळवणारा.

"उगीच एनर्जी वेस्ट करणं आहे हा विषय म्हणजे. चल. आओ यार, जेवायला चल."

"भैया नाही आला अजून."

"डॅम दॅट भैय्या. साल्याला बंद केलं पाहिजे."

नित्या जोडे घालायला उठतो. "बाहेर चलतोस? चिकन मार आएंगे–" तो वाट बघत लेस बांधायचा थांबतो.

"मी तुझ्या बरोबरीचा नाही. मला आवडत नाही ते. तुझ्या घरात राहतो आहे तेवढं पुष्कळ झालं. तेच ओझं वाटतंय." मधू ओढून ताणून आणलेल्या कडवट आवाजात म्हणतो. घाईघाईने वाक्य पूर्ण करतो. जणू ते ऐकवायची संधी नित्या बाहेर गेला तर वाया जाईल इतक्या; लक्षात येण्याइतक्या उतावळेपणानं.

"पुरे, पुरे." नित्या बेफिकीर.

आता हा बाहेर गेला तर? एवढं चंद्रबळ आणलं आहे ते वाया गेलं तर? पुन्हा हा विषय काढायचाही आपल्याला धीर होणार नाही.

"आपण हा विषय आजच संपवला तर नाही का चालणार ?"

"माझ्या दृष्टीनं तर तो संपल्यासारखाच आहे"

"........"

"मला वाटतं तू आता वहिनींना घरी आणावं."

मधूच्या डोक्यापासून पायापर्यंत वीज सळसळत जाते. तरी सांभाळून घेत तो म्हणतो, "आता वेगळं रहायला गेलो की आणेन कदाचित." घर बदलण्याचं तो कन्फर्म करतो तावडतोब.

"का ?" नित्या बेरकथा नजरेनं बघत म्हणतो, "आमची जवळीक आवडत नाही ?"

आणखी एक घाव. मधूला आणखी गळल्यासारखं होतं. त्याच्याच वस्तऱ्यानं त्याचीच बिनपाण्याची चालू असते.

गेल्या दोन वर्षातल्या नित्याबरोबरच्या मिथ्या दोस्तीशी नातं तोडून तो दोन हात करायचं ठरवतो. थोडी तयारी करतो.

"जवळीक ?" त्याच्या डोक्यावरची शीर दिसायला लागते. "व्यभिचार म्हण व्यभिचार. मैत्रीचा फायदा असाही घेतात असं कुणाला सांगूनही खरं वाटलं नसतं. पण–" त्याचा संयम सुटतो. "साल्या, तू माझा संसार नासवलास."

"बी क्वाएट. इतक्या खालच्या पातळीवर येऊ नकोस...बाकी माझं काहीच चुकलं नाही म्हणा. यू सी, मध्या, लग्न झाल्यावरही जर तू रितूबरोबरचे चाळे सुरू ठेवले होतेस तर तुझी बायको–"

"ढोंगीपणा खूप झाला आता. तुझ्या घरी बायकोला घेऊन रहायलाच नको होतं. माझीच चूक झाली."

"यू कुडं हॅव करेक्टेड. रिताचं लफडं तू आटोक्यात ठेवलं असतंस तरी चाललं असतं. बंद नाही तरी आटोक्यात ठेवलं असतंस तरी इट वॉज सफीशिअंट आणि माझ्याबद्दलच्या काय समजुती असतील त्या खोटचा आहेत असं समज. मी स्वतः होऊन कधीच वहिनींकडे–"

"वहिनी तरी कशाला म्हणतोस ?"

"ऑल राईट्, शुभा म्हणत जाईन यापुढे. आणि पुन्हा सांगतो, शी हरसेल्फ ऑफेन्डेड ऑल दि टाईम्स."

जेवायला जाण्यातला त्याचा इंटरेस्ट आता पार गेलेला असतो. तो एक एक कपडा काढून भिरकावीत बोलत असतो,

"तुझा मित्र म्हणून मी आपलं कर्तव्य पार पाडू पाहिलं पहिल्यांदा. पण–"

"मीही काही बोलत नव्हतो."

"तुला भीती वाटत होती–मी रिताच्या तुझ्याशी असलेल्या संबंधाची वाच्यता करेन म्हणून. इजण्ट इट ?"

" नाही. तुझे पैसे. तुझ्या पशांचा मिंधा झालो होतो मी. ब्लॉक मिळत नाही म्हणून तुझ्याकडे आलो आणि तुझं वैभव पाहून घसरलो. फुकटचं वैभव."

" फुकटचं अं ? पुष्कळ शिकलास की माझ्याकडे राहून."

" तुझ्या इन्कमबद्दल तुझ्याजवळ एक्स्प्लेनेशन आहे ?"

नित्या उत्तर देत नाही. बदल्यात अॅक्वेरिअममधला एक लखलखता मासा बाहेर काढतो. परत सोडून देतो. खांदे उडवतो. थोडा वेळ चमत्कारिक थंड लहर दोघां-वरूनही फिरत राहते. दोघंही आपल्यापरी शांत व्हायचा प्रयत्न करतात. फोन वाजतो. कुणी घ्यायचा हे दोघंही एकमेकांकडे निर्विकार डोळ्यांनी बघत ठरवतात. नित्या फोन घेतो. खूपवेळ काहीच बोलत नाही. मग एकदम अंगात आल्यासारखा कपडे करतो. मधूला म्हणतो–

" चल हॉस्पिटलमध्ये. फोन त्यांचाच होता."

" कशाला ?"


" शुभा हॅज बिकम् हिस्टेरिक्. चल लवकर. मी हॉस्पिटलमधूनच आलो होतो संध्याकाळी घरी येताना. तेव्हा नॉर्मल होती. आताच काय झालं समजत नाही."

" त्यांनी काही सांगितलं नाही ?"

" अं हं. ताबडतोब या म्हणाले फक्त. तुला घेऊनच यायला सांगितलं आहे. डिस्चार्ज द्यावा लागेल म्हणाले. किंवा–"

" नाही, नाही. तिला घरी नाही आणायचं–तूच जा एकटा नित्या, आणि तिला तिथेच ठेवायला सांग त्यांना. प्लीज म्हणावं." म्हणता म्हणता त्याचा आवाज घुसमटल्यासारखा यायला लागतो.

" आपण घरी आणायलाच हवं तिला–चल यार, भलत्यावेळी काय हट्ट करतो



आहेस ?" नित्या आपुलकीने म्हणतो–मधूला तरी तसे वाटते. पण त्याला आता काही सुचेनासं होतं. घशात मोठा आवंढा दाटून येतो. मळमळायला लागतं. रडवेल्या आवाजात तो कसंबसं म्हणतो, "नाही रे–नाही. तिला आणून आणखी तुझ्यावर किती ओझं टाकू ? धर्मादाय मॅटर्निटी होम आहे म्हणून बरं आहे. खोली-भाडे तरी नाही. औषधांचा खर्च बघूनच तर माझे डोळे पांढरे होत आहेत. आणखी तिला आणून–आणि तिला आणली की प्रभूलाही आणावं लागणार आजोबांकडून...इटस् इम्पॉसिबल् नित्या. कसं करू रे मी ?" तो चक्क रडायला लागतो.

नित्याला उगीचच थोड ऑक्वर्ड वाटायला लागतं. तो मधूला शांत करायचा प्रयत्न करतो. आणि थोड्यावेळाने तो प्रयत्न सोडून देतो.

मधू आता शांत झालेला असतो. काहीतरी चाळा म्हणून तो उठतो. फ्रीज जवळ जातो. तो उघडून त्याच्याकडे बघत बसतो. मग थोड्या वेळाने एकदम भानावर आल्यासारखा पाण्याची बाटली काढून तोंडाला लावतो. नेहमी सारखा फुर्रर्र...कन् आवाज होणार म्हणून त्याला भीती वाटते. त्याचा अंदाज अचूक ठरतो.

नित्या एकदम त्रासिक चेहेऱ्याने त्याच्याकडे वळून बघतो. पण तो बोलायच्या आधीच मधू एकदम आक्रस्ताळेपणाने ओरडतो–

"रोज बाहेरून येताना तिला भेटून आलो म्हणून सांगतोस साल्या ? लाज नाही वाटत ? जा. तूच घेऊन ये शुभाला. तुझीच तर आहे बायको ती–" अंगावर पाणी सांडतंय याचंही त्याला भान रहात नाही. तो वेडसर दिसायला लागतो. नित्याला त्याची थोडी भीती वाटते. "तिलाही आण, प्रभूलाही आण; तो तुझा पोरगाही घेऊन ये तिच्याबरोबरच जा."

मधू बरळत राहतो. नित्या खरंच उठून बाहेर जातो. जिन्यावर त्याची पावलं वाजत राहतात. मधूला एकटं बरं वाटतं. बाटलीतलं उरलेलं बर्फगार पाणी तो डोक्यावर रितं करतो आणि तसाच येऊन सोफ्यावर बसतो. पुन्हा जुन्या कचरेल प्रश्नांभोवती त्याचं मन पिंगा घालत राहतं. रितूशी नित्यानं लग्न केलं तर ? पण रितूनं तरी त्याला तशी गळ का घालावी ? महिन्यापूर्वी तो रितूला शेवटचा भेटला. त्यावेळी ती अशी का वागली ? नित्याशीच जमवून दे असे का म्हणाली ? आपल्याला मध्यस्थी करायला सांगायचं काय काम ? आणि आपल्यावर गेले पाच वर्षं ती करीत असलेलं प्रेम ? बापरे ? आणि आपण तरी तिला होकारर्थी उत्तर का दिलं या प्रश्नाचं ? 'नित्याशी तुझं लग्न लावून देईन तरच नावाचा मधू' असं आपण कसं काय बरळलो ? मुख्य म्हणजे आपण रितुवर प्रेम का केलं ? ती इतकी उच्छृंखल आहे, आपल्याला तो काहीच लेखत नाही, एवढे असूनही का ? का ?

त्याला जाग येते तेव्हा बारा वाजून गेलेले असतात. दार अजून उघडंच असतं. तो धडपडत उठतो व दार उघडायला जातो. तोच खाली टॅक्सी वाजते. त्याचे

पाय कापायला लागतात. पण नित्या एकटाच टॅक्सीतून उतरतो. मधूला हायसं वाटतं. तो परत आत येऊन कोचात बसतो. मग आठवण येऊन डोकं पुसायला आत जातो. बाहेर नित्याची घाईची पावलं ऐकू येतात, तो मुद्दाम बाहेर यायला उशीर करतो. नित्या ओरडतच आत येतो. त्याला विशेष महत्त्व न देता तो हळूच विचारतो–

"कशी आहे शुभा ?"

"तुझा मुलगा मेला." नित्या कोरड्या तिरसट आवाजात सांगतो.

"छान झालं." नित्यानं आश्चर्यानं वासलेला 'आ' न पाहता तो म्हणतो, "तो माझा मुलगा नव्हताच मुळी. मला काय वाटायचं ते ऐकून ?"

नित्याच्या चेहेऱ्यावर झरझर पालट होतात. तो मधूच्या कानशिलात सणसणीत चमकावतो. "साला. मित्र मित्र म्हणून वागवावं तर जास्तच डोक्यावर बसायला लागला आहेस. तिथे पोरगा मरून पडलाय त्याची विल्हेवाट लावायला चल म्हणतोय तर बरळतोय काय वेड्यासारखा. तिकडे बायको होऊन पडलीय वेडी मुलगा गेल्याने आणि–" आपलं बोलणं अजूनही वायाच चाललं आहे हे पाहून तो हतबुद्ध होतो. शेवटचं पान टाकतो. "रिताही आहे तिथे."

"कुठे ?"

"मॅटर्निटी होममध्ये. त्याच !"

"कशाला ?"

"कशाला ? अॅबॉर्शन झालं तिचं. चार महिने झाले होते. मला तिच्याशी लग्न करायला कशाला सांगत होतास ते कळलं आता. स्वतः करायचं ते करून पुन्हा सारवासारव"–

नित्याचं कंटाळवाणं बोलणं संपतच नाही व मधूला ते एकूही येत नाहीं. महिन्यापूर्वी भेटलेली रितू; तिचं लाघवी बोलणं, तिची विचित्र मागणी, तिच्या ऑफिसातील कुणाशी तरी असलेले तिचं ऐकीव संबंध, त्याच्या एक महिन्याच्या मुलाचे प्रेत, प्रभूने आजोबांकडे रहायला जाताना केलेला आकांत, शुभाचं मानभावी वागणं, सगळं फेर धरून नाचू लागतं त्याच्या भोवती. तो त्याच्यात विरघळून जातो.






लेखांक : एकवीस

जर्मनीच्या सेनासामर्थ्यापुढे पोलंडचा निभाव लागणार नाही ही गोष्ट अगदी स्पष्ट होती. तरीदेखील पोलिश सैनिक निर्धाराने झुंजत होते. एका बलाढ्य सत्तेशी

मुकाबला करताना पोलंडने दाखविलेले धैर्य कौतुकास्पद म्हटले पाहिजे. परंतु संख्याबळात उण्या पडलेल्या पोलंडचा निरुपाय झाला.

सहा सप्टेंबरला क्रॅको हे महत्त्वाचे शहर जर्मन लष्कराच्या हातात गेल्यानंतर पोलंडने आपली राजधानी वॉर्साहून लब्लिन येथे हलविली. विपरित परिस्थितीतही झुंज चालू ठेवण्यासाठी पोलिश सेनानींचा आटापीटा सुरू होता. परंतु पोलंडचे दुर्दैव असे की सतरा सप्टेंबरला रशियाने त्याच्यावर हल्ला चढविला. सारा पोलंड एकट्या हिटलरच्या घशात जाऊ नये यासाठी स्टॅलिनच्या लाल सैन्याने पूर्व पोलंडचे लचके तोडायला प्रारंभ केला. एका बाजूला नाझी हुकुमशहा आणि दुसऱ्या बाजूला कम्युनिस्ट हुकुमशहा यांच्या कात्रीत सापडलेल्या पोलंडचा अखेरचा प्रतिकार अठ्ठावीस सप्टेंबरला संपुष्टात आला आणि दुसऱ्या दिवशी हिटलर आणि स्टॅलिन यांनी पोलंडची आपापसात वाटणी केली. दोन बलाढ्य सत्तांदरम्यान सापडलेल्या पोलंडला फाळणीची विटंबना चौथ्यांदा सहन करावी लागत होती.

पोलंडचा हा असा विध्वंस होत असताना फ्रान्स काय करीत होता? काहीही नाही. पोलंडला मदत करण्याबाबत आपण वचनबद्ध आहोत याचा फ्रेंच नेतृत्वाला विसर पडला होता असे नाही; परंतु पोलंडपायी हिटलरचा आपल्यावर रोष होता कामा नये या भयगंडाने फ्रेंच नेतृत्वाला पछाडले होते. ब्रिटनची अवस्थाही वेगळी नव्हती.

ज्यावेळी जर्मनीने पोलंडवर हल्ला चढविला त्यावेळी जर्मनीच्या पश्चिम सीमेलगत फ्रान्सचे पंचाऐंशी डिव्हिजन सैन्य उभे होते. त्यामानाने जर्मनीची पश्चिम आघाडी अगदीच कमकुवत होती. हिटलरने आपले अवघे चोवीस डिव्हिजन सैन्यच पश्चिम आघाडीवर आणून ठेवले होते आणि त्यापैकी फक्त अकरा डिव्हिजन प्रशिक्षित सैनिकांच्या होत्या. बाकीच्या तेवीस डिव्हिजनमध्ये नव्याने भरती झालेल्या अननुभवी तरुणांचा भरणा होता. हिटलरने आपले सारे विमानदल आणि रणगाड्यांची पथके पोलंडच्या सीमेवर नेऊन ठेवली होती. त्यापैकी एकही विमान वा रणगाडा पश्चिम आघाडीवर हलविण्याची त्याला गरज भासली नाही. आपल्यावरील जर्मन सैन्याचे दडपण कमी करण्यासाठी फ्रान्सने पश्चिम आघाडीवर चढाईचे धोरण स्वीकारावे अशी पोलंडची अपेक्षा होती. परंतु फ्रान्सला तो धीर होणार नाही हे हिटलरला माहीत असल्यामुळे पश्चिम आघाडीवरील लष्करी तयारीकडे दुर्लक्ष केले होते.

जर्मनीबरोबर युद्धाचा पुकारा करूनही फ्रान्सने स्वस्थ बसावे याचा पोलंडला संताप येणे स्वाभाविक होते. जर्मन सैन्य वॉर्साभोवती कोंडी करू लागल्यानंतरही फ्रेंच सैन्याकडून कोणतीच हालचाल होत नाही हे पाहून दहा सप्टेंबरला पॅरिसमधल्या पोलिश राजदूताने जनरल गामेलिन याला विचारले, "पश्चिम आघाडीवर उभं असलेलं तुमचं पायदळ आणि विमानदळ केव्हा पुढे सरकणार आहे?"

'लवकरच' असे गामेलिन याने पोलिश राजदूताची समजूत घालण्यासाठी उत्तर दिले. परंतु त्या उत्तरात तसा काहीच अर्थ नव्हता. कारण गामेलिनने आपल्या पंचाऐंशी डिव्हिजनपैकी अवघ्या नऊ डिव्हिजन जर्मनीच्या सार प्रांतापाशी नेऊन भिडविल्या होत्या. हे फ्रेंच सैन्य सारच्या सीमेपाशी उभ्या असलेल्या जर्मन सैन्यावर अधूनमधून हल्ले चढवीत असले तरी एकंदर युद्धाचा विचार करता या हालचाली अगदीच मामुली स्वरूपाच्या होत्या. फ्रेंच विमाने जर्मन प्रदेशावर टेहेळणी करून परत येत होती. जर्मन शहरांवर किंवा मोर्च्यांवर बॉंबफेक करण्याची त्यांना हिंमत होत नव्हती. आपण जर जर्मन प्रदेशावर बॉंबहल्ले सुरू केले तर जर्मन विमानदल आपला प्रदेश उद्ध्वस्त करील या भीतीने फ्रेंच विमानदलाचे प्रमुख आपल्या वैमानिकांना सबुरीचा आदेश देत होते.

पोलंडच्या आग्रहापायी आपण पश्चिम आघाडीवर जोरदार हल्ले आरंभिले तरी-देखील पोलंडचा पराभव टाळणे आपल्याला शक्य नाही असा व्यावहारिक विचार करून फ्रेंच सरसेनानी गामेलिन स्वस्थ बसला. इतकेच नव्हे तर एकोणतीस सप्टेंबरला पोलंडने शरणागती स्वीकारल्यानंतर त्याने सार प्रांतात घुसविलेले आपले सैन्य पुन्हा मॅजिनो रेषेपर्यंत मागे घेतले.

फ्रान्सच्या या निष्क्रियतेपायीच महायुद्धाच्या प्रारंभीच्या काळात जर्मनी वाचला अशी कबुली अनेक जर्मन सेनानींनी दिलेली आहे. जनरल जोड्लने म्हटले आहे — "१९३९ मध्ये आमचा पराभव झाला नाही याचे एकमेव कारण म्हणजे ब्रिटन आणि फ्रान्स यांचं पश्चिम आघाडीवरचं एकशे दहा डिव्हिजन सैन्य या काळात स्वस्थ बसलं होत."

पोलंड जिंकल्यानंतर हिटलर स्वस्थ बसेल असे फ्रेंच नेत्यांना प्रारंभापासून वाटत होते. त्यांची ही कल्पना दृढमूल करण्यासाठी एकोणीस सप्टेंबरला डॅन्झिगमधल्या गिल्ड हॉलमध्ये बोलताना हिटलर म्हणाला, "ब्रिटन आणि फ्रान्स यांच्याशी युद्ध करण्याचा माझा मुळीच इरादा नाही. त्यामुळे फ्रेंच सेनानी लष्करी तयारी कशा-साठी करीत आहेत हे त्यांचं त्यांना तरी माहीत आहे की नाही कुणास ठाऊक! युद्ध करण्यात कोणाचाच फायदा नसतो हे समजण्याची बुद्धी परमेश्वरानं फ्रान्सला द्यावी अशी मी प्रार्थना करतो."

हिटलरच्या या भाषणाचा अपेक्षित परिणाम झाला. फ्रेंच विचारवंत आपल्या सरकारला सांगू लागले, "ब्रिटनच्या दडपणाला बळी पडून आपण हिटलरला दुख-विण्याचा मूर्खपणा करता कामा नये." फ्रेंच विचारवंतांची ही प्रतिक्रिया कळल्या-नंतर फ्रेंच जनतेची पद्धतशीर फसवणूक करण्यासाठी बर्लिन नभोवाणीवरून वारं-वार सांगण्यात येऊ लागले—"ब्रिटन आणि फ्रान्स युद्धाची भाषा कशासाठी बोलत आहेत हेच आम्हाला समजत नाही. कारण पश्चिम युरोपबद्दल आमची काहीच तक्रार नाही. आम्ही तेथे मुळीच हस्तक्षेप करणार नाही."

ब्रिटन आणि फ्रान्स यांची 'समजूत' घालणारी आवाहने बर्लिन नभोवाणीवरून प्रक्षेपित होत असताना पोलंडच्या मानेभोवतालचा फास आवळण्यात येत होता. त्यासाठीच तर जर्मन परराष्ट्रमंत्री रिबेन्ट्रॉप अठ्ठावीस सप्टेंबरला मॉस्कोला गेला आणि त्याच्या व मोलोटोव्हच्या सहीने जर्मन–रुसो मैत्री कराराची घोषणा करण्यात आली. पोलंडची जर्मनी आणि रशिया यांच्यात फाळणी करण्याची योजना याच करारात अंतर्भूत करण्यात आली होती. जर्मनीने आणखी पूर्वेकडे सरकू नये यासाठी रशियाची प्रारंभापासून धडपड सुरू होती. रुसो–जर्मन मैत्री करारामुळे ही धडपड यशस्वी ठरली. कारण बाल्टिक राष्ट्रे हा रशियाच्या नियंत्रण कक्षाखालील प्रदेश आहे अशी या करारान्वये जर्मनीला कबुली द्यावी लागली. ही कबुली देण्यामागे जर्मनीचाही डाव होता. पश्चिम युरोपमध्ये आपण वाटेल तसा धुमाकूळ घातला तरी त्याबद्दल रशियानें अवाक्षर काढू नये यासाठी पूर्व युरोपबाबत रशियाला सवलती देणे जर्मनीला भाग होते.

अशा रीतीने युरोपची हिटलर आणि स्टॅलिन यांनी आपापसात वाटणी केल्यानंतर त्या दोघांनी शांततेची महती गायला प्रारंभ केला. 'शांततेचे आवाहन' या शीर्षकाखाली मॉस्को आणि बर्लिन येथून प्रसिद्ध करण्यात आलेल्या पत्रकात म्हटले होते– "जर्मनीला सतावणारा पोलंडचा प्रश्न आता निकालात निघाला असून पूर्व युरोपमध्ये शांतता प्रस्थापित झालेली आहे. म्हणून ब्रिटन आणि फ्रान्स यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध चालू ठेवण्याचे कारण उरलेले नाही; तरीही युद्ध चालू ठेवण्याचा ब्रिटन आणि फ्रान्स यांचा हट्ट कायम असेल तर पुढील घटनांबद्दल आणि परिणामांबद्दल त्यांनाच जबाबदार धरावे लागेल."

सहा ऑक्टोबरला हिटलरने राईशस्टॅगमध्ये जे भाषण केले ते याच नमुन्याचे होते. ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या मैत्रीसाठी आपण किती आसुसलेलो आहोत हे तो घोळून घोळून सांगत होता. हिटलर म्हणाला, "गेल्या काही दिवसांपासून जर्मन आणि फ्रान्स यांच्या संबंधांमध्ये जी कटुता आलेली आहे ती दूर करण्यासाठी मी माझ्याकडून खूप प्रयत्न करीत आहे. जर्मनी आणि फ्रान्स या दोन शेजारी राष्ट्रांदरम्यान जे परंपरागत शत्रुत्व निर्माण झालेलं आहे त्याला आपण कायमची मूठमाती द्यावी आणि आदर्श मित्रांप्रमाणे या दोन देशांनी नांदावं ही माझी इच्छा मी वारंवार फ्रेंच नेत्यांना कळविलेली आहे. ब्रिटनबाबतही माझं हेच धोरण आहे. ब्रिटन आणि जर्मनी यांच्यात मैत्रीचे संबंध प्रस्थापित व्हावेत म्हणून देखील मी काही कमी प्रयत्न केलेले नाहीत. ब्रिटनच्या हितसंबंधांना धोका पोचावा असं मी चुकूनही वागलेलो नाही. जर्मनी आणि ब्रिटन यांच्यात मैत्री निर्माण झाली तर युरोपमध्ये चिरस्थायी शांतता नांदेल याबद्दल मला मुळीच शंका नाही."

या भाषणाच्या अखेरीस हिटलर म्हणाला, "फ्रान्स आणि ब्रिटन यांनी जर्मनीविरुद्ध युद्ध का पुकारले ते मला अजूनही समजत नाही. व्हर्सायच्या करारानं

निर्माण केलेला पोलंड जसाच्या तसा राहिला पाहिजे असं त्यांना वाटतं काय? तसं असेल तर मला हे सांगितलंच पाहिजे की त्यांना हवा असलेला पोलंड पुन्हा जिवंत होणं अशक्य आहे. पोलंडचं स्वरूप कसं असावं हा जर्मनी आणि रशिया यांचा प्रश्न आहे. इतरांनी त्यात हस्तक्षेप करण्याचं कारण नाही. अशा परिस्थितीत पोलंडपायी युरोपमधल्या लक्षावधी नागरिकांचं रक्त वहावं ही गोष्ट मला निरर्थक वाटते. पूर्व युरोपातल्या एका देशासाठी पश्चिम युरोपमध्ये युद्धाचा आगडोंब उसळावा हे काही मला पसंत नाही."

केवळ हिटलरलाच नव्हे तर फ्रान्सलाही असे काही व्हावे हे पसंत नव्हते!

हिटलरच्या या भाषणामुळे सर्वसामान्य फ्रेंच नागरिकांची दिशाभूल झाली तर ते समजण्यासारखे होते. परंतु दलादिएचे सहकारी मंत्री त्याला म्हणू लागले, "आता जर्मनीबरोबर युद्ध चालू ठेवण्यात काहीच स्वारस्य नाही. हिटलरच्या शब्दावर आपण विश्वास ठेवला पाहिजे." फ्रेंच मंत्र्यांचे हे मत पॅरिसमधील इटालियन आणि स्पॅनिश राजदूतांमार्फत हिटलरला कळत होते.

परराष्ट्रमंत्री बॉन्ने हा तर 'युद्ध नको' या आग्रहाचा अग्रदूत होता. पोलंडने शरणागती स्वीकारल्यानंतर त्याचा युद्धाबाबतचा उत्साह मावळला असेही नव्हे. तीन सप्टेंबरला फ्रान्सने जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली आणि त्यानंतर पाच दिवसांनी म्हणजे आठ सप्टेंबरला स्पॅनिश राजदूताने बर्लिनला जे पत्र धाडले त्यात म्हटले होते-"जर्मनीविरुद्ध युद्ध करायला फ्रेंच जनमानस पहिल्यापासूनच उत्सुक नसल्यामुळे एकदा का पोलंडनं शरणागती स्वीकारली की लगेच फ्रान्सने जर्मनीबरोबर शांतता-करारासंबंधी वाटाघाटी कराव्यात असे बॉन्ने याला वाटत आहे. त्या दृष्टीने त्याचा मुसोलिनीशी पत्रव्यवहारही सुरू झालेला आहे!"

दोन ऑक्टोबरला बर्लिनमधील इटालियन राजदूत अत्तोलिको विझसॅकरला मुद्दाम भेटायला आला. अत्तोलिको त्याला म्हणाला, "आताच पॅरिसमधल्या आमच्या राजदूताकडून मला पत्र आलेलं आहे. फ्रान्सची अब्रू वाचवायची असेल तर ताबडतोब जर्मनीशी शांतता-करार केला पाहिजे असं बहुसंख्य फ्रेंच मंत्र्यांचं मत असल्याचं त्या पत्रात म्हटलं आहे."

फ्रेंच प्रधानमंत्री दलादिए हा मात्र थोडया वेगळ्या मताचा होता. जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारावे की नाही यासंबंधी प्रारंभी त्याच्या मनात संदेह होता हे खरे. परंतु पोलंडची जी दशा झाली ती लक्षात घेता हिटलरच्या शब्दावर विश्वास ठेवणे घातक ठरेल याबद्दल त्याची खात्री झाली होती. त्यामुळे सहा ऑक्टोबरचे राईशस्टॅगमधील हिटलरचे] भाषण वाचल्यानंतर दुसऱ्या दिवशी पॅरिस नभोवाणीवरून बोलताना तो म्हणाला, "आक्रमण] रोखण्यासाठी फ्रान्सनं हातात शस्त्र घेतलेलं आहे हे लक्षात घेतलं पाहिजे. त्यामुळे युरोपच्या शांततेबाबत आणि सुरक्षिततेबाबत आम्हाला निश्चित स्वरूपाचं आश्वासन मिळेपर्यंत आम्ही शस्त्र खाली ठेवणार

नाही. कोणीही उठावं आणि दर सहा महिन्यांनी युरोपमधल्या शांततेवर आघात करीत रहावं हे आम्ही सहन करणार नाही. "

बारा ऑक्टोबरला हाऊस ऑफ कॉमन्समध्ये बोलताना चेंबर्लेन यानेही अशाच आशयाचे निवेदन केले.

हिटलरला नेमके तेच हवे होते.

युरोपमध्ये युद्ध चालू ठेवण्याची आपली इच्छा नाही, ब्रिटन आणि फ्रान्स यांच्या हटवा ी धोरणामुळे युद्ध आपल्यावर लादले जात आहे अशी इतर युरोपीय राष्ट्रांची समजूत करून देण्यासाठीच केवळ त्याने पोलंडच्या शरणागतीनंतर शांततेचे मान-भावी आवाहन केलेले होते. ते आवाहन ब्रिटन आणि फ्रान्स यांनी फेटाळताच तेरा ऑक्टोबरला बर्लिन नभोवाणीवरून सांगण्यात आले–"फ्युररची शांतता–योजना अँग्लो-फ्रेंचांनी फेटाळन लावली असल्यामुळे जर्मनीविरुद्धचं युद्ध चालू ठेवण्याचा त्यांचा आग्रह अद्यापही कायम आहे हेच सिद्ध झालेलं आहे. जर्मनीवर युद्ध लादण्यात येत आहे "

वस्तुस्थिती नेमकी उलट होती. पोलंडमधील युद्ध संपायच्या सुमारास म्हणजे सत्तावीस सप्टेंबरला हिटलरने प्रमुख सेनानींना आपल्या कचेरीमध्ये मुद्दाम बोलावून घेतले होते. ब्रिटन आणि फ्रान्स यांची लष्करी तयारी पूर्ण झालेली नसल्याचा उल्लेख करून हिटलर म्हणाला, "आपल्याला शक्य तितक्या लवकर पश्चिम युरोप ताब्यात घेतला पाहिजे. "

या बैठकीत हिटलरने पश्चिम युरोपीय युद्धाचा मुहूर्तही निश्चित केला होता–१२ नोव्हेंबर १९३९.

त्यानंतर दहा ऑक्टोबरला हिटलरने आपल्या सेनानींना पुन्हा सांगितले–"पश्चिम युरोपचा संपूर्ण विनाश घडवून आणल्याशिवाय आपल्याला स्वस्थ बसायचं नाही. बेल्जम, हॉलंड आणि लक्झेंबर्ग हे तीन देश चटकन ताब्यात घेऊन आपल्याला फ्रान्स नेस्तनाबूत करायचा आहे. "

पश्चिम युरोपचा आणि विशेषत: फ्रान्सचा विनाश लवकर कसा घडवून आणता येईल या विचाराने हिटलर अस्वस्थ झालेला आहे याची पॅरिसला शुद्धही नव्हती.

हिटलरच्या शांतता–आवाहनाची आपण दखल घेतली पाहिजे असे बॉन्ने ज्याला त्याला सांगत होता. आपले हे मत कसे बरोबर आहे हेही तो समजावून देत असे. बॉन्ने म्हणायचा, "पोलंडच्या फाळणीनंतर जर्मनी आणि रशिया यांच्या सीमा परस्परांना भिडलेल्या आहेत. त्यामुळे जर का कराराचा भंग करून जर्मनीनं आपल्यावर हल्ला चढविला तर लगेच रशिया जर्मनीवर आक्रमण करून आपल्या मदतीला येईल. कारण रशियाशी पूर्वी आपण मैत्रीचा करार केलेला आहे !"

फ्रॅन्को-रूसो कराराचा कागद स्टॅलिनने केव्हाच फाडून टाकलेला आहे एवढी

साधी गोष्टही फ्रान्सचे परराष्ट्रमंत्रिपद भूषविणाऱ्या या गृहस्थाच्या ध्यानात आलेली नव्हती.

जर्मनीशी शांतता-करार करण्याबाबतचा आपला आग्रह सोडायला बॉन्ने तयार नाही हे पाहून दलादिएने त्याच्याकडून परराष्ट्रमंत्रिपद काढून घेतले आणि न्याय-खात्यासारखे मामुली खाते सोपविले. आज तरी बॉन्ने याला आपले स्थान कळायला हवे होते. परंतु मंत्रिमंडळाच्या बैठकीत जर्मनीचा विषय निघाला की ही स्वारी 'युद्ध टाळले पाहिजे 'चे रडगाणे गाई. बांधकाममंत्री मोन्झी हाही बॉन्नेसारखाच युद्धविरोधी होता. त्याचे पालुपद ठरलेले असे– 'जर्मनीशी युद्ध करण्याचा मूर्ख-पणा आपण टाळला पाहिजे.' पॅरिसमधल्या विचारवंतांनाही याच विचाराने पछा-डले होते. त्यांच्या परिसंवादांचा विषय एकच होता– 'जर्मनीबरोबरचे युद्ध अपरि-हार्य आहे का?' आणि परिसंवादाचा निष्कर्ष असे– 'मुळीच नाही.' जॉर्ज दूपोलिनसारखा कामगार नेता आणि मार्सेल दिएनसारखा समाजवादी पुढारी हेही आपल्या वृत्तपत्रांतून 'युद्ध टाळता आले तर टाळावे, त्यातच फ्रान्सचे हित आहे.' अशा आशयाचे लेख लिहीत होते. शांततावादाचा ध्यास घेतलेल्या या डाव्या पक्षाच्या नेत्यांना वस्तुस्थितीचा पार विसर पडलेला होता. 'युरोपात युद्ध भडकले तर सारे जग रक्ताच्या महापुरामध्ये वाहून जाईल' अशी ते भीती दाखवित होते. ते म्हणत, "अहो आमचाच काय, पण आघाडीवरच्या सैनिकांचाही युद्धाला विरोध आहे. म्हणून युरोपमधली शांतता कशी टिकेल याचाच आपण सर्वांनी विचार केला पाहिजे. त्यासाठी हिटलरकडून खलिता येण्याची वाट पहाण्याचंदेखील कारण नाही. कारण युद्धासाठी जी किंमत मोजावी लागते त्यापेक्षा शांततेसाठी मोजावी लागणारी किंमत नेहमीच कमी असते."

भेकडांच्या शांतताप्रेमापायी एखाद्या देशाला आपल्या स्वातंत्र्याची किंमत मोजावी लागते हे या पुस्तकी पंडितांना लवकरच अनुभवावे लागणार होते.

डाव्या गटाचे शांतताप्रेम पराकोटीला गेले होते तर उजव्या गटांना हिटलरशी युद्ध पुकारणे मंजूर नव्हते. साम्यवादाला रोखणारी शक्ती म्हणून त्यांना हिटलर-संबंधी ममत्व वाटत होते. साम्यवादाच्या आदिपीठाशी हिटलरने हातमिळवणी केलेली आहे ही वस्तुस्थिती हे उजवे गट सोयीस्करपणे डोळ्याआड करीत होते. गमतीची गोष्ट अशी की फ्रेंच कम्युनिस्ट पक्षाचाही स्टॅलिनच्या या नव्या मित्रांशी युद्ध करायला विरोध होता. एवढेच नव्हे तर पोलंडवरील रशियाच्या आक्रमणाचे 'मुक्तियुद्ध ' म्हणून फ्रेंच कम्युनिस्टांनी स्वागत केले होते.

ॲलेक्सी लेगेटसारखा परराष्ट्रखात्याचा सचिवही महिन्याभरात बदलला होता. हिटलरशी नमते घेण्याचे बॉन्ने याचे धोरण आपल्याला पसंत नाही असे तो नेहमी म्हणत असे. परंतु पोलंडच्या पाडावानंतर तोही हताश स्वरात बोलू लागला.

अमेरिकन राजदूत बुलिट याच्याशी बोलताना तो म्हणाला, "हिटलर, स्टॅलिन आणि मुसोलिनी या तीन हुकूमशहांशी मुकाबला करण्याची फ्रान्सवर पाळी आलेली आहे. अजून ब्रिटनची लष्करी तयारी झालेली नाही. अमेरिका आपलं तटस्थतेचं धोरण सोडायला तयार नाही. अशा परिस्थितीत एकटा फ्रान्स तीन हुकूमशहांशी मुकाबला करू शकणार नाही."

हिटलरचे फ्रान्सवर केव्हाही आक्रमण होऊ शकेल अशी परिस्थिती निर्माण झाल्यावरही फ्रान्समधील राजकीय पक्ष आपले मतभेद बाजूला सारून एकदिलाने काम करायला तयार झाले नाहीत. जर्मनीबरोबर युद्ध घोषित केल्यापासून दलादिए सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न करीत होता, परंतु राजकीय नेत्यांचे रुसवे फुगवे कायम असल्यामुळे त्याचा हा प्रयत्न यशस्वी होऊ शकला नाही. 'लिऑं ब्लूमसारख्या समाजवाद्याला मंत्रिमंडळात घेतले तर आपण मंत्रिमंडळात येणार नाही.' असे लुई मारीन या कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाच्या नेत्याने कळविले. समाजवादी पक्षही तितकाच हट्टी होता. 'आमच्या पक्षाचा प्रतिनिधी मंत्रिमंडळात घ्यायचा असेल तर ब्लूमलाच घेतले पाहिजे' असा त्यांनी आग्रह धरला. त्यामुळे शेवटी मारीन आणि ब्लूम या दोन्ही पक्षनेत्यांना बाजूला ठेवणे दलादिएला भाग पडले.

बॉन्ने याच्याकडून काढून घेतलेले परराष्ट्रमंत्रिपद रॅडिकल पक्षाच्या हेरिओ याच्याकडे सोपवावे असा दलादिएचा विचार होता. मार्शल पेताँ हा त्यावेळी स्पेनमध्ये राजदूत म्हणून काम करीत होता. त्याला फ्रँको, हिटलर आणि मुसोलिनी या हुकूमशहांबद्दल प्रेम वाटते हे हेरिओ याला माहीत होते, आणि तो स्वतः तर या हुकूमशहांचा कट्टर विरोधक होता. त्यामुळे तो दलादिएला म्हणाला, "मी परराष्ट्रमंत्रिपद स्वीकारायला तयार आहे, पण एका अटीवर. मार्शल पेताँ यानं या मंत्रिमंडळात आलं पाहिजे."

हे जमणे कठीण आहे हे दलादिएला माहीत होते. तरीही त्याने सॅन सेबास्टिएन येथून पेताँ याला बोलावून घेऊन मंत्रिमंडळात येण्याचे आवाहन केले. पेताँ याने लाव्हलसारख्या आपल्या मित्राला सल्ला विचारला. लाव्हलने त्याला वेगळेच सुचविले, "दलादिएच्या सरकारला लोकांचा फारसा पाठिंबा नाही. त्यामुळे तू शासनयंत्रणाच आपल्या ताब्यात घे."

पेताँ याला ही दगदग सोसवणारी नव्हती. त्यामुळे दुसऱ्या दिवशी त्याने दलादिएऐवजी गामेलिनची भेट घेतली. पेताँ म्हणाला, "हेरिओ हा हिटलर, फ्रँको आणि मुसोलिनी यांचा कट्टर विरोधक आहे हे मला माहीत आहे. त्यामुळे तो जर परराष्ट्रमंत्री होणार असेल तर मंत्रिपद स्वीकारणं मला जमणार नाही हे तू दलादिएला सांग."

पेताँ स्पेनला परतला, पण लाव्हलचे शब्द त्याच्या मनात घुमत होते. त्यामुळे

त्याने हेन्री लेमेरी या प्रजासत्ताकावर विश्वास नसलेल्या संसद सदस्याला सॅन सेबास्टिएन येथे बोलवून घेतले. कोणालाही न कळविता लेमेरी दहा ऑक्टोबरला तेथे गेला. पेतांला तो म्हणाला, "केवळ सरकारमध्येच नव्हे तर सैन्यातही गोंधळ माजलेला आहे. अशा वेळी तुझ्यासारख्या मुरब्बी योद्धयानं सत्ता आपल्या हाती घ्यावी असं मला वाटतं. पहिल्या महायुद्धाच्या काळात क्लेमेन्सो नव्हता का प्रधानमंत्री झाला?"

पेतां उत्तरला, "मला राजकारणाची काहीही माहिती नाही. त्यामुळे प्रधानमंत्रिपद स्वीकारणं मला शक्य नाही."

लेमेरीचे उत्तर तयार होते. तो म्हणाला, "लाव्हलसारखे अनुभवी लोक मंत्रिमंडळात घेतले तर तुला सरकार चालविणं अवघड जाणार नाही."

पेतांला आपली कुवत माहीत होती. तो म्हणाला, "जी गोष्ट जमण्यासारखी नाही ती मी करणार नाही."

लाव्हलसारखा महत्त्वाकांक्षी आणि कारस्थानी गृहस्थही स्वस्थ बसलेला नव्हता. लेमेरी आणि पेतां यांच्यात झालेले बोलणे त्याच्या कानावर आलेले होते. पेतांने प्रधानमंत्रिपद स्वीकारले तर आपल्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त होईल हे ओळखून लाव्हल पेतांची तारीफ करू लागला. त्यासाठी त्याने आपले ठरीव तंत्र अवलंबिले. दररोज तो एकेका संसद सदस्याला अलिशान उपाहारगृहामध्ये जेवायला नेई आणि 'पेतांसारखा कर्तबगार माणूस संध्याच्या आणीबाणीच्या काळात देशाचा सूत्रधार असणे किती आवश्यक आहे' हे त्याला पटवून देण्याचा प्रयत्न करी.

या साऱ्या गोष्टी पॅरिसमधल्या इटालियन राजदूताला कळताच त्याने जर्मन परराष्ट्रसचिव विझसॅकर याला पत्र लिहिले-"फ्रान्सने जर्मनीबरोबर युद्धाच्या भानगडीत पडू नये असे मार्शल पेतां याचे मत आहे. त्यातून जर्मनीबरोबरच्या युद्धात यदाकदाचित फ्रान्स विजयी झाला तरी त्याच्या हातात अपरंपार हानीशिवाय काहीही पडणार नाही याबद्दल पेतांची खात्री आहे. त्यामुळे फ्रान्समध्ये 'जर्मनीबरोबर युद्ध नको' असे म्हणणाऱ्या गटाचा जोर व्हावा असे जर तुम्हाला वाटत असेल तर तुम्ही पेतां याला हाताशी धरावे. म्हणजे विनासायास पॅरिस तुमच्या हातात पडेल."

या काळात पॅरिस अगदी निवांत होते.

आर्क द त्रायंफमधून आपण आपली विजयी सेना केव्हा मिरवित नेतो आणि १९१८ मधल्या मानहानीची सव्याज भरपाई केव्हा करतो असे हिटलरला झालेले आहे याचा पॅरिसला १९४० साल उजाडले तरी पत्ता नव्हता. रात्री दहा वाजल्यानंतर प्रकाशबंदी जारी करण्यात आली याबद्दलच पॅरिसमधील नागरिक कुरकुरत होते. तरी देखील तेथील विलासी निशाजीवन पूर्वीप्रमाणेच रसिकांना खुणावत होते. नृत्यगृहे आणि मद्यगृहे दुथडी भरून वहात होती. नवे चित्रपट आणि नवी

नाटके प्रदर्शित होत होती. वृत्तपत्रे आपले स्तंभच्या स्तंभ या कलाकृतींच्या मूल्य-मापनासाठी खर्च करीत होती. साहित्यातील किंवा तत्त्वज्ञानातील एखादा कूट प्रश्न घेऊन पॅरिसमधले विचारवंत त्यावर आपली बुद्धी घासत होते. बाहेर युरोप-मध्ये काहीही होवो, युद्धाचा ओरखडा आपल्या अंगावर उठणार नाही याबद्दल पॅरिस निश्चित होते.

आघाडीवरची परिस्थितीही यापेक्षा वेगळी नव्हती. गेले कित्येक महिने खंदकात नुसतेच बसून रहावे लागल्यामुळे वीस लक्ष फ्रेंच सैनिक सुस्तावले होते. हा वाया जाणारा वेळ सैनिकांच्या शिक्षणासाठी खर्च करा असे कर्नल द गॉलसारखा एखादा जागरूक सेनाधिकारी सांगत होता. "पोलिश युद्धाचे धडे" या शीर्षकाखाली आपल्या वरिष्ठांना धाडलेल्या पत्रात द गॉलने म्हटले होते–'रणगाड्यांच्या वापरा-मुळे जुन्या युद्धकल्पना पार कोसळल्या आहेत हे पोलंडमधल्या युद्धावरून स्पष्ट झालेले आहे. शत्रूच्या रणगाड्यांपुढे आपले मोर्चे असेच कोसळून पडतील. सुदैवाने आपल्याजवळही रणगाडे आहेत. मात्र ते वापरायचे कसे याबद्दल आपल्या सैनिकांना पुरेसे शिक्षण मिळालेले नाही. त्यातून सध्या पायदळाचा पूरक विभाग एवढेच रणगाड्यांना जे महत्त्व देतो तेही चुकीचे आहे. रणगाड्यांची स्वतंत्र पथके फार मोठी कामगिरी करू शकतात हे जाणून घेऊन तशी पथके उभारायला हवीत.'

हे पत्र वाचल्यानंतर जनरल दुफे याने गामेलिनला लिहिले, 'कर्नल द गॉल याची सूचना विचारात घेण्याचे कारण नाही. कारण जर्मन रणगाडे पोलंडमध्ये यशस्वी ठरले म्हणून ते फ्रान्समध्येही यशस्वी ठरतील असे मानायचे कारण नाही. पाय-दळाचा पूरक विभाग एवढेच रणगाड्यांचे मर्यादित महत्त्व आहे हे माझे मत अद्यापही कायम आहे!'

गामेलिनच्या दृष्टीने दुफे याचे पत्र पुरेसे होते. त्याला स्वतःला द गॉलच्या सूचनेसंबंधी विचार करण्याची गरज भासली नाही. त्यामुळे सैनिकांना नव्या युद्ध-पद्धतीचे शिक्षण देण्याऐवजी त्यांचा कंटाळा दूर करण्यासाठी गामेलिनने आघाडी-वर मनोरंजन गृहे उघडली. सैनिकांच्या करमणुकीसाठी पॅरिसहून खास नाट्यसंस्था धाडण्यात येऊ लागल्या. तरीही सैनिकांचा वेळ जाईना. म्हणून त्यांना आलटून-पालटून रजा देण्याचे सत्र सुरू झाले. या रजेचा काळ मद्य पिण्यात सैनिक व्यतीत करीत होते. त्यामुळे सैनिकांसाठी वेगळी मद्यालये सुरू झाली. आपण खाकी गणवेष अंगावर चढवला असला तरी आपल्याला युद्ध करावे लागणार नाही असे सैनिक मानून चालले होते. त्यामुळे एखाद्या अधिकाऱ्याने कवायतीला बोलाविले तर ते त्याची चेष्टा करीत.

जर्मन प्रचार यंत्रणाही याबाबतीत पुढाकार घेत होती. आघाडीवर उभ्या असलेल्या फ्रेंच सैनिकांना उद्देशून बर्लिन नभोवाणीवरून फ्रेंच भाषेमध्ये कार्यक्रम सादर केले जात होते. प्रत्येक कार्यक्रमाच्या शेवटी फ्रेंच सैनिकांना सांगितले जाई–

' इंग्लंडसाठी तुम्ही आपल्या प्राणांवर का उदार होता? पोलंडसाठी मरायला तुमचे प्राण वर आले आहेत का? ब्रिटननं सांगावं आणि फ्रान्सनं मुकाट्यानं ऐकावं हे तुमच्या सरकारचं धोरण तुम्हाला पसंत आहे काय? आम्ही तुम्हाला एका गोष्टीची ग्वाही देतो. तुम्ही जर आमच्यावर गोळी झाडली नाही तर आपण होऊन आम्ही काही करणार नाही.'

शत्रूकडून एवढे आश्वासन मिळाल्यानंतर फ्रेंच सैनिकांना आणखी काय हवे होते? नाटके पहायला आणि मद्य प्यायला ते आता मोकळे झाले होते.

बारा नोव्हेंबरची तारीख हिटलरच्या डोळ्यापुढे सारखी तरळत होती. म्हणून त्याने पाच नोव्हेंबरला सेनानींना बोलावून घेऊन आणखी आठवडाभराने पश्चिम युरोपमधील चढाईचा मुहूर्त करण्याची त्यांना आठवण करून दिली. पश्चिम युरोपीय युद्धाबाबत इतकी घाई करू नये असे जनरल ब्रॉटिश याच्यासह अनेक जर्मन सेनानींचे मत होते. त्यामुळे पाच नोव्हेंबरच्या बैठकीला जाण्यापूर्वी ते सारेजण झोसेन येथल्या ब्रॉटिशच्या कचेरीत जमले होते. त्यावेळी असे ठरले की हिटलरने बारा नोव्हेंबरचा आग्रह धरला तर त्याला तेथल्या तेथे अटक करायची. परंतु म्युनिक कराराच्या अगोदरचा हिटलरला सत्ताभ्रष्ट करण्याचा सेनानींचा बेत जसा हवेत विरून गेला तसेच यावेळीही घडले. बर्लिनला जाताना जनरल ब्रॉटिश

## दिवाळी अंकासंबंधी वर्गणीदारांस सूचना

सर्व वर्गणीदारांना दिवाळी अंक नेहमीच्या वर्गणीतच दिला जातो. अंक व्यवस्थित मोजून साध्या पोस्टाने पाठविला जातो. तरीही अंक न मिळाल्यास प्रथम स्थानिक पोस्टाकडे चौकशी करावी, तेथे लेखी तक्रार द्यावी व तक्रारीची एक प्रत आमच्याकडे पाठवावी. अंक शिल्लक असल्यास अवश्य पाठविला जाईल.

रजिस्टर्ड पोस्टाने अंक हवा असल्यास २२ ऑक्टोबर पर्यंत एक रुपया अधिक पाठवावा.

ज्यांची वर्गणी २८ ऑक्टोबर ७० पूर्वी संपत असेल त्यांनी वार्षिक वर्गणी लगेच रवाना करावी. म्हणजे त्यांना दिवाळी अंक पाठविता येईल.

व्यवस्थापक
**माणूस द्विसाप्ताहिक**

हिटलरला कशी उत्तरे द्यायची याची आपल्या मनाशी उजळणी करीत होता. हिटलरने बारा नोव्हेंबरची आठवण करून देताच ब्रॉटिश म्हणाला, "पश्चिम आघाडीवरील युद्ध आपण लगेच सुरू केलं तर पुरेशा तयारी अभावी आपली नाचक्की होईल असं आघाडीवरच्या बऱ्याच सेनानींनी मला कळविलं आहे. त्यातून सध्या हिवाळा असल्यामुळे हवाही चांगली नाही. असल्या हवेत विमानदलाचं सहाय्य मिळू शकत नाही; म्हणून उन्हाळ्यापर्यंत आपण थांबावं असं मला वाटतं."

ब्रॉटिशचे हे उत्तर ऐकताच हिटलर खवळला आणि जमलेल्या साऱ्या सेनानींना तो शिव्या देऊ लागला. सगळ्यांचे लक्ष ब्रॉटिशकडे होते. परंतु हिटलरच्या त्या संतापाने ब्रॉटिश एवढा थरकापत होता की झोसेन येथे केलेला विचार कृतीत आणणे त्याला सर्वस्वी अशक्य होते. मान खाली घालून तो आणि त्याचे सहकारी हिटलरच्या खोलीतून बाहेर पडले.

पाच नोव्हेंबरच्या बैठकीत बारा नोव्हेंबरचा मुहूर्त पुढे ढकलायला हिटलरने विरोध केला हें खरे पण पुढे त्यानेच हे ना ते कारण सांगून एकंदर चौदा वेळा पश्चिम युरोपीय युद्धाची तारीख पुढे ढकलली.

या काळात स्टॅलिन स्वस्थ बसलेला नव्हता. फिनलंड आणि तीन बाल्टिक राष्ट्र यांचे स्वतंत्र अस्तित्व त्याला पहिल्यापासून सलत होते. त्यामुळे त्याने तीस नोव्हेंबरला अचानक फिनलंडवर स्वारी केली. फिनिश सैनिकांनी आपले सारे सामर्थ्य एकवटून लाल सैन्याचा लोंढा दोन महिने थोपवून धरला; परंतु शेवटी लाल सैन्याच्या अजस्र संख्याबळापुढे असहाय फिनलंडचा निःपात झाला.

हिटलरच्या पोलंडवरील आक्रमणाच्या वेळी गप्प बसलेली फ्रेंच वृत्तपत्रे स्टॅलिनच्या फिनलंडवरील स्वारीच्या वेळी ओरडून उठली. फ्रान्सने फिनलंडला मदत केलीच पाहिजे असा सर्व वृत्तपत्रांनी आवाज उठविताच फ्रेंच युद्धसाहित्याचे एक जहाज तेरा डिसेंबरला फिनलंडच्या दिशेने मार्गस्थ झाले. एकोणीस डिसेंबरच्या ब्रिटिश आणि फ्रेंच सेनानींच्या संयुक्त बैठकीमध्ये फिनलंडला आणखी मदत करण्याचे ठरले. परंतु त्याबाबतीत ब्रिटनने प्रत्यक्षात फारसा उत्साह दाखविला नाही. कारण रशियाला शक्य तो दुखवायचे नाही हे ब्रिटनच्या परराष्ट्रीय धोरणाचे सूत्र होते.

फिनलंड ताब्यात घेऊन स्टॅलिन बाल्टिक समुद्रामध्ये आपले वर्चस्व प्रस्थापित करीत आहे हे पाहताच हिटलरनें आपल्या मूळच्या कार्यक्रमात बदल केला. हॉलंड, बेल्जम आणि लक्झेंबर्ग जिंकून फ्रान्सकडे मोर्चा वळविण्याच्या अगोदर नॉर्वे आणि डेन्मार्क ही वायव्य युरोपमधील राष्ट्रे ताब्यात घेणे हिटलरच्या पुढच्या उद्दिष्टांच्या दृष्टीने आवश्यक होते. जर्मनीला युद्धसाहित्यासाठी आवश्यक असलेल्या कच्च्या लोखंडाचा पुरवठा स्वीडनमधून होत होता. या पुरवठ्यात ब्रिटनकडून व्यत्यय आणला जाऊ नये म्हणून नॉर्वे–डेन्मार्कवर आपले निर्विवाद प्रभुत्व प्रस्थापित झाले पाहिजे हे हिटलरला जाणवले. नॉर्वेमध्ये व्हिडकुन क्विस्लींग याने नाझी पक्ष स्थापन

केलेला असल्यामुळे हिटलरला नॉर्वेमध्ये अनायासे हस्तक लाभला होता.

बारा मार्चला फिनलंडने शरणागती स्वीकारल्यानेच फ्रान्समध्ये खळबळ उडाली. दलादिएच्या निष्क्रियतेवर चारी बाजूंनी झोड उठविण्यात येऊ लागली. या टीकेचा जोर अल्पावधीत एवढा वाढत गेला की एकवीस मार्चला दलादिएला प्रधानमंत्रिपदाचे त्यागपत्र द्यावे लागले. फ्रान्सला आता कणखर प्रधानमंत्री हवा आहे है ओळखून राष्ट्राध्यक्ष लेब्रन याने 'फ्रेंच चर्चिल' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पॉल रेनॉ याला प्रधानमंत्रिपद स्वीकारण्याची विनंती केली आणि रेनॉ याने ती मानलीही. दलादिएप्रमाणे रेनॉ यानेही सर्वपक्षीय मंत्रिमंडळ बनविण्याचा प्रयत्न केला; परंतु मारीन आणि ब्लूम अजूनही एकत्र यायला तयार नव्हते. त्यामुळे जे कोणी सहकार्य करायला तयार झाले त्यांना घेऊन रेनॉ याने आपले मंत्रिमंडळ बनविले. तरीदेखील त्याने एक गोष्ट कटाक्षाने केली. गेल्या पंधरा वर्षांत फ्रान्समध्ये पंधरा मंत्रिमंडळे अधिकारावर आली आणि कोसळली. परंतु या प्रत्येक मंत्रिमंडळात बॉन्ने होताच. रेनॉ याने त्याला वगळले. आतापर्यंत प्रधानमंत्री असलेल्या दलादिएने परराष्ट्रमंत्रिपद स्वीकारावे अशी रेनॉची इच्छा होती. परंतु ती जबाबदारी स्वीकारायला दलादिएने नकार दिला. त्याऐवजी त्याने संरक्षणखाते स्वतःकडे घेतले.


रेनॉचा द गॉलच्या कर्तृत्वावर विश्वास होता. त्यामुळे तो आपल्याला सल्लामसलतीसाठी पॅरिसमध्ये उपलब्ध असावा म्हणून मंत्रिमंडळाच्या युद्धसमितीचे सचिवपद त्याला द्यावे असा रेनॉचा विचार होता. परंतु द गॉलला ही महत्त्वाची जागा द्यायला दलादिएने विरोध केला. दलादिए म्हणाला, "जर द गॉलला युद्धसमितीचा सचिव करण्यात आलं तर मी संरक्षणमंत्रिपदाचं त्यागपत्र देईन."

प्रारंभीच आपापसात कटकटी नकोत म्हणून रेनॉ याने आपला आग्रह मागे घेतला आणि युद्धसमितीचे सचिवपद दलादिएच्या आग्रहापायी पॉल बोदों नावाच्या एका सुमार बुद्धीच्या माणसाकडे सोपविले.

१९४० चा एप्रिल उजाडला. वसंतऋतूच्या आगमनाच्या पहिल्या खुणा सगळीकडे फुलारून आल्या होत्या. या अशा सुरेख वातावरणात नव्या चढाईचा मुहूर्त करायला हिटलर आसुसला होता.

पश्चिम आघाडीने गेले सात महिने जपलेली चमत्कारिक शांतता विसकटायला आता फारसा अवधी उरलेला नव्हता.

(क्रमशः)



# काही थोर शास्त्रज्ञ

जगाच्या उत्पत्तीपासून आजपर्यंत मानवाची झालेली प्रगती काही एकाएकी झालेली नाही. अनेकांच्या प्रयत्नांचे ते फलित आहे. अशाच 'जगाच्या उन्नतीस कारणीभूत झालेल्या काही थोर शास्त्रज्ञां'चा परिचय डॉ. वि. ना. गोखले यांनी प्रस्तुत पुस्तकात करून दिला आहे.

या पुस्तकात 'आधुनिक विज्ञानशास्त्राचा प्रणेता' गॅलिलिओ यापासून तो 'आपल्या संशोधनाने जगाला थक्क करून सोडणाऱ्या' आल्बर्ट आइन्स्टाइनपर्यंत अनेक शास्त्रज्ञांची माहिती संक्षिप्त चरित्ररूपाने सांगितली आहे. ही चरित्रमालिका गुंफताना, श्री. गोखल्यांनी 'शास्त्रज्ञ' ही संकल्पना पुष्कळ व्यापक मानली आहे. त्यामुळे जगाच्या भौतिक प्रगतीला ज्यांनी हातभार लावला त्यांच्याबरोबर मानवाच्या कल्याणासाठी जे झटले त्यांचाही समावेश या पुस्तकात केला गेला आहे. उदा० 'नवीन जग धुंडाळणारा' बॅरन फॉन हुंबोल्ट, 'आफ्रिका खंड धुंडाळणारा' डेव्हिड लिव्हिंग्स्टन आणि रुग्णाइतांची सेवा करणारी फ्लॉरेन्स नाईटिंगेलसुद्धा या मालिकेत आहे.

शास्त्रज्ञाचा परिचय करून देताना श्री. गोखल्यांनी अवलंबलेली पद्धत उद्बोधक व मनोरंजक आहे. शास्त्रज्ञाच्या चरित्रात साधारणतः त्याने लावलेल्या शोधांची तपशीलवार माहिती सांगितली जाते. मराठीतील सर्वसामान्य वाचकाला

कु. रेखा जोशी

अशी चरित्रे वाचणे कंटाळवाणे वाटण्याची शक्यता असते. पण श्री. गोखल्यांची ही चरित्रे मात्र कंटाळवाणी होत नाहीत.

चरित्रलेखाच्या शिरोभागी शास्त्रज्ञाचे नाव देताना, 'जीवनशास्त्रातील वर्गीकरणाचा प्रणेता' (कार्ल लिनिअस), रुग्णाइतांची कैवारीण' (फ्लॉरेन्स नाईटिंगेल), 'निसर्गशास्त्र व कीटकशास्त्रवेत्ता' (जीन हेन्री फेबर) असे समर्पक विशेषण योजून त्या त्या शास्त्रज्ञाचे प्रमुख कार्य सूत्ररूपानें सांगितले आहे. प्रत्यक्ष चरित्रात, विज्ञानरसायनातील बेंजामिन फ्रँकलिनचे विद्युत्‌विषयक प्रयोग, मादाम क्यूरी व पेरी क्यूरीचे रेडियम–थोरियम धातूतून होणाऱ्या किरणोत्सर्जनाचे आणि 'पोलोनियम' या नवीन घटकद्रव्यसंबंधित प्रयोग जितक्या सहजपणे सांगितले आहेत तितक्याच रोचकतेने भास्कराचार्यांच्या गुणाकाराच्या सहा पद्धती सादर केल्या आहेत.

या शास्त्रीय माहितीबरोबरच, न्यूटनने पवनचक्की सारखी फिरत रहावी म्हणून केलेली उंदरांची योजना आणि चाकाच्या वरच्या बाजला टाकले जाणारे मक्याचे दाणे यांची मजेदार युक्ती किंवा आपले लग्न आहे हे विसरून, लग्नाच्या दिवशीही प्रयोगशाळेत काम करत राहणाऱ्या लुई पाश्चरविषयीची ही आख्यायिका, लेखकाने आवर्जून सांगितली आहे.

पुस्तक वाचताना एक गोष्ट जाणवते : फक्त पंडित भास्कराचार्य आणि सी. व्ही. रामन या दोनच भारतीयांचा परिचय या मालिकेत आहे.

मानव हा आपल्या संशोधनाचा केंद्रबिंदू ठेवून जीवनाला प्रगतीशील करणाऱ्या एकवीस थोर विज्ञानोपासकांच्या जीवनाचा सर्जनशील आलेख या पुस्तकात वाचावयास मिळतो. तो जितका विचारप्रवर्तक तितकाच रम्य व उद्‌बोधकही आहे. विशेषत: शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हे पुस्तक अत्यंत उपयुक्त आहे.

काही थोर शास्त्रज्ञ : डॉ. वि. ना. गोखले : पॉप्युलर प्रकाशन, मुंबई : मूल्य सहा रुपये


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालों आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासुन मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (बी. एन.) पो. कतरीसराय (गया)

डॉ. नरेंद्र दाभोळकर

# अपुऱ्या अन्नाचे आघात

मूल डोक्याने साधारण निघते. लवकर वाचत नाही, वाचलेले आठवत नाही. अभ्यासात मंद वाटते. नंबर टोकाला असतो. गरीब आईबाप शिकवणीचा वगैरे थोडा खटाटोप करतात पण लवकरच त्यांचा उत्साह मावळतो. देवाने अक्कल द्यावयाच्या वेळेस बाळचा फिरायला गेला होता किंवा त्याने चाळण नेली होती, असे स्वतःचे समाधान करत मुलाच्या शिक्षणाला रामराम देण्यात येतो.

लहान वयात मिळणारे अपुरे पोषण ही भारत, पेरु, मेक्सिको, बायफ्रा आणि जगातील इतर अनेक अशिक्षित देशांतील समस्या आहे. लहान वयातील अपुऱ्या अन्नाचे परिणाम मुलाला जन्मभर भोगावे लागतात. पण आईच्या गर्भाशयात आणि जन्मल्यानंतरच्या पहिल्या काही महिन्यात जर हे पोषण अपुरे राहिले तर त्याचे परिणाम शरिराबरोबर मेंदूवरही होऊन ते अधिक तीव्र, कायम व गंभीर स्वरूपाचे होतात. चिली देशात अलीकडेच झालेल्या भयंकर दुष्काळानंतर तेथील बालकांची केलेली पहाणी आणि याबाबतीत निरनिराळया ठिकाणी प्रयोग करून काढलेले निष्कर्ष हे जगातील अपुऱ्या अन्नावर वाढणाऱ्या सुमारे चाळीस कोटी छोट्यांच्या बद्दल चिंता वाटावयास लावणारे आहेत.

आपल्या मेंदूतील मज्जापेशींची संख्याही जन्माच्या वेळीच जवळ जवळ नक्की झालेली असते. स्त्रीच्या गरोदरपणात तिचे अपुरे झालेले पोषण विशेषतः नत्रयुक्त पदार्थांचा तुटवडा यामुळे गर्भाशयातील अर्भकाच्या मेंदूतील एकूण पेशींची संख्या ही मुळातच कमी होण्याची निश्चित शक्यता असते. या स्वरूपाच्या परिणामाचे स्वरूप वा पडताळा पाहण्यासाठी कॅलिफोर्निया विद्यापीठातील डॉ. मार्थन आणि मार्गोलीस यांनी उंदरावर प्रयोग केले. उंदराची एक पिढी त्यांनी ८ टक्के तर दुसरी २७ टक्के नत्रयुक्त पदार्थांवर वाढविली. योग्य वेळी त्या माद्यांना पिले झाली. आठ टक्के अन्न देऊन वाढविलेल्या माद्यांच्या पिलांच्या मेंदूतील एकूण पेशी कमी होत्याच पण त्याबरोबरच प्रत्यक्ष पेशीत नत्रयुक्त पदार्थाचे (Protein) चे प्रमाण आणि पेशीच्या कार्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असलेले DNA याचे प्रमाण बरेच कमी झाले होते. माणसाच्या बाबतही ही शक्यता नाकारता येत नाही.

"ज्या वेळी मेंदूची वाढ सर्वांत वेगाने होत असते त्यावेळीं झालेले थोडेसेच अपुरे पोषण मेंदूचा आकार आणि मज्जापेशींची संख्या यावर कायमचा परिणाम घडवू शकते. त्यानंतरच्या काळात बालकाला अत्यंत चांगल्या प्रकारचे पोषण सुदैवाने मिळालेच तरी देखील आधी झालेला परिणाम थोड्या प्रमाणातच किंवा कदाचित अजिबातच बदलला जात नाही." मँचेस्टर विद्यापीठाच्या 'अपुऱ्या पोषणाचे मुलाच्या बौद्धिक व मानसिक वाढीवर परिणाम' या संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. डोवींग यांनी मेक्सिकोमधील लहान मुलांच्या बाराव्या जागतिक अधिवेशनात हे विचार मांडले. प्राण्यांवर केलेल्या विविध प्रयोगातून याला पुरावा मिळाला आहे. एकाच उंदराच्या मादीच्या निरनिराळ्या पिलांना जर आईचे दूध कमीजास्त प्रमाणात दिले तर त्याच्या वाढीवर त्याचे वेगवेगळे परिणाम निश्चितपणे दिसून येतात. अपुऱ्या दुधावर वाढलेल्या पिलाच्या मेंदूचा आकार कमी होतो आणि नंतर उत्कृष्ट प्रकारे अन्नपुरवठा करूनही झालेला परिणाम फारसा सुधारता येत नाही.

या निष्कर्षाप्रमाणे मेंदूची वाढही नेमक्या वयातच घडून यावी लागते. या ना त्या स्वरूपानें ही संधी हुकल्यास चुकीची दुरुस्ती करण्याची संधी कायमची निघून जाते. उंदराच्या पिलांच्या मेंदूच्या वेगवान वाढीचे वय जन्मानंतरच्या पहिल्या काही आठवड्यात असते. नऊ महिन्यातील उदरातील वास्तव्यापैकी शेवटच्या काही आठवड्यात मानवाच्या मेंदूची सर्वात अधिक वेगाने वाढ होते. जन्मल्यानंतर ती कमी होते. आणि सुमारे सहा महिन्यात पूर्णपणे थांबते. यावेळी मुलाला जर पुरेसे पोषण मिळू शकले नाही तर मेंदूचा आकार आणि वजन बरेच कमी होते आणि मानसिक वाढही अपुरी रहाते.

चिली विद्यापीठाच्या डॉ. विनिक यांनी एक वर्षाच्या आतील जी मुले अपुऱ्या अन्नामुळे झिजून मरण पावली त्यांच्या मेंदूचा व अपघाती व इतर कारणांनी मरण पावलेल्या पण योग्य पोषण झालेल्या मुलांच्या मेंदूचा अभ्यास केला. या मुलांच्या मज्जापेशीतील प्रमाण पंचवीस ते पासष्ट टक्क्यापर्यंत कमी झालेले आढळून आले.

बाल्टीमोर येथील हॉपकीन विद्यापीठात निरनिराळ्या प्राण्यांच्या पोटात गर्भ वाढण्याच्या वेळी त्यांचे नेहमीचे खाणे ५०% कमी करून प्रयोग करण्यात आले. या प्राण्यांना झालेल्या संततीमध्ये काही गोष्टी शिकण्याची कुवत, दिलेली काम करण्याची क्षमता व एकूण भावनाविश्व हे पूर्ण अन्न देऊन वाढविलेल्या माद्यांच्या पिलांपेक्षा निश्चितपणे कमी झालेली आढळून आली.

ज्या मुलाचे पोषण अगदी सुरुवातीच्या काळात याप्रमाणे त्रुटित झालेले असते त्यांचा बुद्धयांक बराच कमी आढळतो. तीव्र स्वरूपाची कमतरता अनुभवावी लागलेल्या मुलात तो बासष्ट इतका कमी आढळला. वाचणे, लिहिणे आणि इतर सर्वच बौद्धिक बाबतीत यामुळे कमतरता आढळून येते.

थोडक्यात अपुरे पोषण केवळ शारीरिक दृष्टयाच नव्हे तर मानसिक दृष्टयाही

माणसाला अधू बनवते, कमकुवत ठरवते. जितक्या बालवयात आणि ज्या प्रमाणात हे नशिबी येते त्या प्रमाणात त्याचे दुष्परिणाम अटळ ठरतात.

या देशातील कोट्यावधी बालकांना या ना त्या स्वरूपात हे परिणाम भोगावे लागत आहेत. अन्नआघाडीवरच्या लढाईच्या गंभीरपणाची, तीव्रतेची आणि निकडीची जाणीव होण्यासाठी हे चित्र पुरेसे बोलके आहे.

## ' जेव्हा आपण रागावतो '

राग म्हणजे दुसऱ्याच्या चुकांसाठी स्वतःवर घेतलेला सूड होय. हसू आणि राग कसा येतो हे शास्त्रीय दृष्टया सांगणे मोठे अवघड आहे. पण आपल्यापैकी प्रत्येक जणाने या दोन्ही गोष्टी अनुभवलेल्या असतात. इतर अनुभवताना आपण बघत असतो. या ना त्या स्वरूपाच्या निराशेची, तीव्र नाखुषीची, प्रतिकार करण्याच्या खुमखुमीची बऱ्याच वेळा राग ही एक प्रतिक्रिया असते. रागावतात सर्वचजण; पण काही जण तो काबूत ठेवू शकतात, तर काही जणांच्याबाबत त्याचा स्फोट होतो. या मानसिक स्फोटाचे परिणाम समाजात सर्वत्र दिसतातच.

या मानसिक बदलाबरोबर शारीरिक बदलही घडून येतात. आणीबाणीची परिस्थिती समजून शरीर तयार होते. बुबुळे मोठी होऊन अधिक प्रकाश आत घेऊ लागतात. लाळ कमी प्रमाणात तयार झाल्याने तोंड कोरडे पडते. हातापायाचे स्नायू ताठ आणि लढण्यासाठी (वा पळण्यासाठी) तयार बनतात. फुफ्फुसे अधिक कार्यक्षम बनतात. शरिरातील अन्नसाठ्याकडून काम करण्याची ताकद ( energy ) अधिक प्रमाणात उपलब्ध व्हावी म्हणून फुफ्फुसे जास्तीतजास्त प्राणवायू आत घेण्याचा प्रयत्न करतात. केवळ प्राणवायूचा पुरवठा वाढून चालत नाही. तो शरिराला पुरवणाऱ्या तांबड्या रक्तपेशीही लागतात. रक्तपेशी निर्मितीची एक प्रमुख जागा—प्लीहा (Spleen) तयार होऊन अधिक रक्तपेशी शरिरात सोडते. हृदयाची स्पंदने वाढतात. अधिक रक्त हृदयामार्फत शरिराला पुरविले जाते. यकृत अधिक ताकदीसाठी अधिक साखर (Glucose) शरिराला पुरवते. पचनसंस्थेचे पोट आणि आतडी यांचे काम मंदावते, कारण पचन हे त्यामानाने दुय्यम काम बनते. अन्न खातानाच राग आल्यास त्याचा तर पचनक्रियेवर निश्चितच परिणाम होतो. मूत्रपिंडाच्या वरच्या बाजूस असलेल्या अॅड्रेनिल (Adreneal) या ग्रंथी अतिशय जोराने काम करू लागतात. त्यांच्या स्रावांचा मज्जासंस्थेवर परिणाम घडून येतो. मेंदूचा रक्तपुरवठा खूपच वाढतो.

तेव्हा मित्रांनो, हसून लठ्ठ झाला नाहीत तरी चालेल, पण वारंवार रागावून विनाकारणच स्वतःच्या शरिराला व मनाला ताण देण्याइतके मठ्ठ तरी होऊ नका (माफ करा, मोफत सल्ल्याबद्दल राग नाही ना आला ?) ¤ ¤ ¤

लाटकरांना आपल्या वडिलांची कथा वाचून दाखवण्याची समर्पक सूचना केली. बाईंनी नितळ आवाजात 'मेकॅनो' ही संग्रहातली कथा, तिच्यातले सूक्ष्म अन्वयाचे पदर नीट उलगडून दिसतील अशा सफाईने वाचली. श्रोते भारावून गेले. कथेला 'मेकॅनो' हे शीर्षक कोलारकरांनी ह्या नव्या संग्रहाच्या निमित्ताने दिलं. मुळात लिमयांचं शीर्षक "प्रेम आणि पातिव्रत्य" असं बाळबोध आहे. सोहोळ्याचा दिवस कुसुमाग्रजांनी घाटदार, अनाग्रही असूनही विचारप्रवण, आणि औचित्यपूर्ण सफाईदार भाषण करून जिंकला. पु. लं. नी ताब्यात घेतलेल्या सभेत सतत खसखस पिकवली हे आता आवर्जून सांगण्यात काही प्रयोजन नाही.

फर्ग्युसन रोडवरल्या 'सदाफुली' ह्या शांत बंगल्यातली एक अंधारी अभ्यासिका. तिथल्या लांबट बाकड्याकडे बोट दाखवून सौ. लाटकर म्हणाल्या, 'काकांनी दवाखान्यासाठी म्हणून पन्नास वर्षांपूर्वी तयार करून घेतलेलं हे बाक आहे. पण त्यांनी खासगी प्रॅक्टीस केली नाही. आता तेच बाकडं इथे आलं.' कॅ. लिमयांनी दुरुस्ती केली, 'प्रायव्हेट प्रॅक्टीसचा जम बसला नाही. मी मुंबई नगरपालीकेचा असिस्टंट हेल्थ ऑफिसर झालो. इमाने इतबारे नोकरी करून सेहेचाळीस साली सेवानिवृत्त झालो. त्रेपन्नपासून इथे पुण्यातच आहे. विनोदकार चिं. वि. जोशी हे माझे भाचे. तेही इथेच होते.'

अता वयोमानपरत्वे ते फारसे हिंडत–फिरत नाहीत. सहा महिन्यापूर्वी ते पडले. पाय दुखवला. धाप लागली. जीवावरचं दुखणं आलं. पण निभावलं. जणू त्यांचा पुनर्जन्मच झाला. आता माडीवरच दिवस काढतात. कान, डोळे, हात आणि शुद्ध वाणी शाबूत आहेत. त्यामुळे जमेल तेवढं वाचतात. मुळात ते अबोलच आहेत. तरीही त्यांची पेटंट अर्धी विजार आणि खमीस घालून आणि फक्त उजव्या डोळ्याला भींग लावून ते उत्साहाने संभाषणात भाग घेत होते.

'आत्मचरित्र वगैरे तुम्ही लिहिणार आहात काय ?'

'नाही. मागे मो. ग. रांगणेकरांनी संपादीत केलेल्या 'मी आणि माझे लेखन' ह्या पुस्तकात मी माझ्याबद्दल माहिती दिलेली आहे. पंधरवड्यापूर्वी 'रुद्रवाणी' मध्ये थोडी माहिती लिहिली. यापेक्षा वेगळं आत्मचरित्र काही मी लिहिणार नाही. कारण तसं माझं आयुष्य साधं, सरळसोट आहे. 'सैन्यातील आठवणी' हे माझं मेसापोटेमियातील अठरा सालच्या युद्धातल्या आठवणींचं पुस्तक म्हणजे एकापरीनं आत्मचरित्रच आहे. त्या पुस्तकाचा विशेष म्हणजे त्यातली सगळी चित्रं मी स्वतः काढली आहेत.'

'सैन्यातील आठवणी' हे कॅ. लिमयांचं एक पूर्णतः उपेक्षित पण उत्तम पुस्तक आहे. मराठी लेखकांचं अनुभवविश्व तोकडं आहे असा सवंग शेरा मारून आपण

बोटं मोडतो. पण ऐन विशीत एक लेखक युद्ध असतं तरी कसं ते पाहायला प्रत्यक्ष युद्धभूमीवर जातो आणि तिथे घेतलेल्या अनुभवांवर सचित्र पुस्तक लिहितो आणि त्याचं व्हावं तितकं चीज होत नाही! मोठी नाऊमेद करणारी गोष्ट आहे. जवळ-पास पंधरा वर्षांनी तेच पुस्तक मी चाळत आहे. तो जिवंत मजकूर आणि ती जल-रंगी चित्रं मनाला समाधान देत आहेत. लष्करी गणवेषातले तरुण कॅप्टनसाहेब छान तरतरीत दिसतात. जरेने त्यांची ती ऐट आता निकालात काढली आहे.

'तुम्ही चित्रकला कुठे शिकलात?"

'माझे वडील सबजज्ज होते. फिरतीची नोकरी. एकदा आम्ही बेळगावला होतो. तिथे शाळेत शिकत असताना ड्रॉइंगच्या दोन परीक्षा दिल्या. पुढे परीक्षा दिल्या नाहीत. पण चित्रं काढतच राहिलो. माझ्या पुस्तकांचा विशेष म्हणजे त्यांची वेष्टणं आणि आतली चित्रं मी स्वतः काढली आहेत. पुस्तकांच्या वेष्टणांवर चित्रं टाकायला माझ्यापासूनच सुरुवात झालेली दिसते. पूर्वी पुस्तकांवर चित्रं नसत. पंच-वीस साली प्रसिद्ध झालेल्या माझ्या 'विनोदसागर–तरंग पहिला' ह्या पुस्तकावर व्यंगचित्र छापलेलं आहे. मात्र ते मी स्वतः काढलेलं नाही. दुसऱ्या कुणाचं तरी आहे. पण तोपर्यंत मराठी साहित्यात मुखपृष्ठावर व्यंगचित्र कधीही झालेलं नाही.'

'तुम्ही लिहायला केव्हा आणि का सुरुवात केली?'

'बारा साली. केवळ हौस म्हणून.'

'कुठे लिहिलंत?'

'कै. मित्रांच्या 'नवयुग', 'मनोरंजन' वगैरे मासिकांमधून. 'विविधज्ञान-विस्तार' त्यावेळी जोरात होतं. पण ते विद्वानांचं उच्चभ्रू मासिक होतं. मी त्या-बाजूला फिरकलो नाही. 'नवयुग', 'मनोरंजन' सामान्य वाचकांमध्ये फार लोक-प्रिय होती.'

'मोबदला किती मिळे?'

'छे! ती कल्पनाच नव्हती. लेख छापून आला ह्याचंच कौतुक वाटायचं. लेख-काचं मानधन वगैरे अलीकडच्या गोष्टी आहेत.'

'तुमच्या कथा, लेख कधी साभार परत यायच्या?'

'यायच्या. पण त्या मग दुसरीकडे कुठे तरी प्रसिद्ध होत. तसं पडून काहीच राहिलं नाही.'

'तुम्ही लिहायला सुरुवात केलीत त्यावेळी खास विनोदी असं कोण लिहायचं?'

'आठवत नाही.'

'गडकरी, कोल्हटकर वगैरे?'

'ते होतेच. पण दुसरे कुणी आठवत नाहीत.'

'तुमचे आवडते लेखक कोण होते?'

'पी. जी. वुडहाऊस, सर आर्थर कॉनन डाईल. इतरांची नावं आता आठवत नाहीत.'

'कुठल्या साहित्यिकांशी तुमची मैत्री होती?'

'कुणाशीही नाही. कोल्हटकरांना फक्त एकदा पाहिलेलं होतं. बाकी गाठीभेटी कुणाशीच झाल्या नाहीत.'

'आचार्य अत्र्यांशी?'

'नाही! लेख पाठवा म्हणून अधूनमधून ते पत्र पाठवायचे. इतकंच..'

'साहित्यिक चळवळीत तुम्ही कधी होता?'

'कधीच नाही. साहित्यिकांमध्ये माझी बैठक नव्हती.'

'कधी साहित्य संमेलनात वगैरे गेलात?'

'छे!'

'नाटकं पाहिलीत?'

'थोडीशी. बालगंधर्वांची पाहिली. सुरेख गायचा. पण सुरुवातीला अभिनयात कच्चा होता. मूक चित्रपट पाहून त्याने आपला अभिनय सुधारला असावा.'

'तुम्ही करायचेत काय?'

'सकाळ-संध्याकाळ म्युनिसिपालीटीची नोकरी. फावल्या वेळात प्रथमोपचाराचे, आरोग्यवर्धनाचे क्लास घेत होतो. लंडनच्या सेंट जॉन ॲम्बुलन्सचा मी अधिकारी होतो. तो मान सहसा भारतीयांना, नि विशेषतः मराठी माणसांना कधीच मिळत नसे. मला मिळाला. पण आपल्या लोकांना त्याचे काय होय? प्रथमोपचार, आरोग्य, डासांचा फैलाव आणि नाश वगैरे विषयावर मी पुस्तकं लिहिलेली आहेत. पण वाचक मला विनोदी लेखक म्हणूनच ओळखतात. संपादकही विनोदी लेखांची मागणी करतात. साहित्यिक वर्दळीपासून दूर एका बाजूला बसून मी सातत्याने लेखन करीत आलो आहे.

'अजूनही करता?'

'हो. अलोकडेच मी एका वर्षी दिवाळी अंकामध्ये तेवीस विनोदी लेख आणि गोष्टी लिहिल्या आहेत!'

'तुम्ही केव्हा लिहिता?'

'पहाटेची वेळ मला पसंत असते.'

'तोंडी मजकूर सांगता की हाताने लिहिता?'

'नेहेमी स्वतः हाताने लिहितो. तेच आवडतं.'

कॅ. लिमयांचं अक्षर अगदी लहान, सुवाच्य आणि स्वच्छ आहे. खाडाखोड नसते. मजकुराखाली मोडीत लपेटीदार सही असते. आकाशवाणीवरली कीर्तनं वगैरे ऐकूनसुद्धा ते आम्हाला दोन दोन ओळींची कार्डं पाठवतात. मी लिमयांची कार्डं तर मैलावरूनही चटदिशी ओळखतो, इतका त्यांचा खास स्वतःचा असा तोंडवळा असतो.

'तुम्ही लिहिलेल्या पुस्तकांवर अनुकूल अभिप्राय यायचे? की प्रतिकूल?'

'बहुतेक सर्वांनी चांगलंच लिहिलं.'

'मग तुमचा गवगवा कसा झाला नाही?'

'आज आहेत तसे नव्या दृष्टीचे प्रकाशक तेव्हा नव्हते. राजगुरू मास्तर, गणेश

महादेव, केमकर आणि मंडळी, वगैरे होते. पण त्यांना क्रमिक पुस्तकात रस असायचा. आमची पुस्तकं साहित्यबाह्य कारणांनीही निघायची. माझे थोरले बंधु ना. गं. लिमये बालवाङ्मयाचे लेखक आहेत. प्रकाशक-लेखक संबंध सध्या जसे स्निग्ध असतात, चलनवलन जसं सध्या वाढलेलं आहे, ह्या धंद्याला सध्या जसं प्रेस्टीज आलेलं आहे, तसं त्या जमान्यात नव्हतं. शुकशुकाट होता. तशात प्रकाशकांशी माझ्या ओळखीही नव्हत्या. मी त्यांच्याशी व्यवहारही केले नाहीत. मला पैसेही मिळाल्याचं आठवत नाही. पण मला त्याचं काही वाटलंही नाही.'

वाचकांशी ओळखी नाहीत, लेखकांशी मैत्री नाही, साहित्यिक वर्तुळात बैठकी नाहीत, प्रकाशकांमध्ये रस नाही, साहित्यापासून दहा कोस दूर असलेला म्युनिसिपालीटीच्या डॉक्टराचा पोटापाण्याचा व्यवसाय, हौस म्हणून समाजसेवा केली ती प्रथमोपचाराच्या क्षेत्रात आणि भरीला अबोल स्वभाव, इतक्या दिशांनी उलटं वारं वाहात असतानाही कॅप्टनसाहेबांनी सतत पन्नास-साठ वर्षं एक टाकी हरहुन्नरी लेखन करावं, हे आश्चर्य नव्हे ? त्यांनी नाटकं लिहिली, विनोदी एकांकिका लिहिल्या, कथा, विनोदी साहित्य, प्रथमोपचारावरली पुस्तकं, असं सारं काही लिहिलं. पण वाचकांच्या चित्तावर त्यांची फक्त एकच मुद्रा उमटली—विनोदकाराची ! मराठी विनोदी वाङ्मयाचं नवनीत तयार करायचं झालं, तर कॅ. लिमयांचं त्यात मानाचं पान असलंच पाहिजे, असं आम्ही सर्वजण म्हणत होतो. आता राम कोलारकरांनी लिमयांच्या प्रज्ञेचा दुसरा झळाळ प्रकाशात आणला. वाचकांचं आणि लिमयांचंच नव्हे, तर मराठी साहित्याचं नि लिमयांचं एक नातं आता जोडलं जात आहे. नवा प्रवास सुरू झाला. तो सुखकर होवो !

कॅ. लिमयांच्या वृद्ध खांद्यावर जीवन-साफल्याचंच जणू महावस्त्र सैद्धांतिक बैठकीवरून ज्यांनी टाकलं, आणि ह्यानिमित्ताने ज्यांचा बोलबाला झाला, त्या श्री. राम कोलारकरांबद्दल ओझरत्या परिचयाचे चार शब्द. ह. भ. प. पांगारकरांच्या हातून बाराखडया शिकलेल्या चांदा जिल्ह्यातल्या ह्या पस्तीशीच्या तरुणाचं शिक्षण नागपूरच्या मॉरीस महाविद्यालयातुन इंटर आर्टस्पर्यंत झालेलं आहे. सुषमा, दैनिक महाराष्ट्र, समाचार भारती, पॉप्युलर, किर्लोस्कर, हंस वगैरे नियतकालीकांतुन आणि प्रकाशन संस्थांमधून गेली पंधरा वर्षे संपादनकार्याचा अनुभव. 'नवे लेखन' हे स्वतःचं मासिक आणि प्रकाशन त्यांनी मध्यंतरी नागपूरहून चालवलं. काव्य आणि कथालेखन केलं आहे; करीत आहेत. १८५४ ते १९२४ ह्या कालखंडातील 'सर्वोत्तम मराठी कथा, भाग १' हा संग्रह पाप्युलरतर्फे प्रसिद्ध. १९२५ ते १५३४ ह्या कालखंडातील वेचक कथांचा दुसरा खंड प्रकाशनाच्या मार्गावर. किर्लोस्कर आणि हंस मासिकांमधील कथानवनीताचं संपादन चालू आहे. कथा धुंडाळण्याच्या ह्या अगडबंब व्यापात त्यांच्या पत्नी सौ. छाया ह्यांचा सिंहाचा वाटा आहे. सध्या वास्तव्य पुण्याच्या थंड हवेत.

□ □ □

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

# अंदाज

१७ ते २३ ऑक्टोबर १९७०

**मेष :** शनिवार-रविवारी घरासंबंधीचे व्यवहार पार पाडण्यास दिवस चांगले आहेत. सरकारी कामात यश प्राप्त होईल. प्रवासयोग येईल. त्यात प्रगती होईल. शत्रूंचा नाश होईल. रवि-गुरू युती भाग्योदयकारक गोष्टी घडवून आणील.

विद्याभ्यासात अपयश येण्याचा संभव आहे. थोडासा हेकेखोरपणा याला कारण आहे. भावंडांकडून मदत होईल. आठवड्याच्या शेवटी घरात काहीतरी शुभ समारंभ घडण्याचा जोरदार योग आहे. अनपेक्षित शुभ घटना घडतील.

चंद्राचे भ्रमण २।३।४ या घरातून आहे. ते चांगलेच आहे. धनस्थिती चांगली राहील. हातून पराक्रमाची कृत्ये पार पडतील. सर्वांचे मन राखून आपला हेतू साधता येईल. सर्व आठवडाच शुभफलदायी आहे.

**वृषभ :** या आठवड्यात धनस्थितीत चांगलीच सुधारणा होईल. भावंडांकडून व भागिदारांकडून प्रत्येक व्यवहारात मदत होईल. घरात थोडासा मतभेद होईल. सरकारी कामात यशःप्राप्ती होणे जड जाईल.

विद्याभ्यासात काहीतरी महत्त्वाची घटना घडेल. साहित्यिक, लेखक, प्रकाशक यांना प्रगतीकारक दिवस आहेत. संततीचा उत्कर्ष होईल. परदेशगमनाची संधी मिळेल. उद्योगधंदा चांगला जमण्याची शक्यता कमी. त्यातल्या त्यात फॅन्सी मालाच्या व्यापाऱ्यांना दिवस जरा बरे जातील.

चंद्राचे भ्रमण १।२।३ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. रविवारी व सोमवारी सार्वजनिक स्थानिक समारंभात भाग घ्यावा लागेल. थोडक्या श्रमात मानमरातब प्राप्त होईल. शुभ तारखा १८।१९।२०।२१.

**मिथुन :** आठवड्याच्या सुरवातीलाच आर्थिक अडचण उपस्थित होण्याचा योग आहे. येणारी रक्कम हातात पडण्याला उशीर होईल. प्रवासाचा बेत रहीत करावा. नुकसान होण्याचा संभव आहे. घरातील मंडळींसह मंगळवार आनंदात जाईल.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होईल. सरकारकडून अनुदान मिळण्याची शक्यता आहे. प्रेमसंबंधात अडथळे निर्माण होतील. व्यापारउद्योग चांगला चालेल. सरकारी कामे करणाऱ्यांना अनेक बाजूंनी पसा प्राप्त होत राहील.

चंद्राचे भ्रमण १२।१।२ या घरातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. पहिले दोन दिवस कुटुंबात मतभेद होण्याची बरीच शक्यता आहे. वादविवाद टाळावेत. पंचमातील गुरू-रवी सर्व अडचणीतून सोडवतील. मित्रांकडून मात्र अव्यवहारी सूचना दिल्या जातील त्या मानू नयेत. शुभ तारखा १९ ते २३.

**कर्क :** सप्ताहाची सुरवात प्रवासाने होण्याचा योग आहे. मुलाच्या नोकरी-

उद्योगाच्या प्रयत्ना करताच हा प्रवास घडेल. भागिदारांकडून या कामात पुष्कळच मदत होईल. धंदाव्यवसाय अतिशय वाढीला लागेल. खर्चाची प्रकरणे निघतील. विशेषकरून शुक्रवारी घरीच काहीतरी धार्मिक शुभसमारंभ होईल.

लेखकांना सप्ताह प्रगतीपथावर नेणारा आहे. ललित वाङ्मय, नाट्यलेखन, लघुकथा वगैरे लिहिणारांचे हातून चांगले लिखाण घडण्याचा योग आहे. या राशीच्या व्यक्ती चंचल स्वभावाच्या असतात. पण चतुर्थातले रवी, गुरू सर्व बाबतीत यश मिळवून देतील.

चंद्राचे भ्रमण ११।१२।१ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. मंगळवार-बुधवार थोडेसे मनाला उद्विग्न करणारे प्रसंग उद्‌भवतील. ज्यांच्यावर उपकार केले आहेत अशांकडूनच अपमान होईल. शुभ तारखा १७।१८।२२।२३.

सिंह : सप्ताहाच्या सुरुवातीला बरेच दिवस अडकून पडलेली व्यवहारातील रक्कम प्रत्यक्ष हातात पडण्याचा योग आहे. धार्मिक बाबतीत भाग घेण्याची वेळ येईल. कलाकार, नाट्यव्यावसायिक, फॅन्सी वस्तूंचे व्यापारी यांना भरपूर फायदा मिळण्याचा योग आहे. भागिदारांकडून नकळत नुकसान होण्याचा बराच संभव आहे.

संततीचा उत्कर्ष होईल. इंजिनियर झालेल्या मुलांना चांगली सरकारी नोकरी लागण्याचा योग आहे. कंत्राटी कामे करणारांना काम भरपूर मिळेल. ३६ वर्षाच्या वरील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. अनैतिक व बेकायदेशीर दारू विकणारांची धरपकड होण्याचा जास्त संभव आहे.

चंद्राचे भ्रमण १०।११।१२ या स्थानातून होत आहे. ते फारच चांगले आहे. गुरुवारी व शुक्रवारी घरच्या मंडळींसह अत्यंत आनंदात जातील. जवळच वनभोजनाला जावे लागेल. सबंध सप्ताहच शुभफलदायी आहे.

कन्या : सरकारमधून येणारी रक्कम हातात पडण्याचा योग आहे. दुसरा गुरू व रवी सर्व बाबतीत यशस्वी करतील. लग्नी बुध, मंगळ आहेत. पराक्रमाला आणि नोकरीत प्रगती करण्याला ते मदत करतील. ही प्रगती अनपेक्षित होईल. यादृष्टीने मंगळवार, बुधवार चांगले जातील.

विद्याभ्यासात थोडेसे अपयशच पदरी पडेल. संततीकडून अत्यंत अडचणीत पाडणारी परिस्थिती निर्माण केली जाईल. एकच गोष्ट चांगली म्हणजे तुळेतील रवीगुरु एखादी फौजदारी केस निर्माण झाली तरी त्यातून संरक्षण करतील. फार जपून पावले टाकावीत. शत्रूचा नाश होईल पण त्याकरता मानसिक यातना फार होतील.

चंद्राचे भ्रमण ९।१०।११ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शनिवारी प्रवासयोग येईल. प्रवासात कायम स्वरूपाचा फायदा होणाऱ्या गोष्टी घडतील. शुभ तारखा १७।१८।२२।२३.

तूळ : सप्ताहाच्या सुरुवातीपासून आर्थिक अडचणी निर्माण होतील. पत्नीच्या आजाराकरता बरीच रक्कम खर्च करावी लागेल. भाग्योदयकारक गोष्टी घडण्याला

आयत्यावेळी घरातील अस्थिर वातावरणामुळे विलंब लागेल. धंदा भागिदार नुकसानीत आणतील. हा अनुभव शनिवारी–रविवारी येईल. इभ्रतीला कमीपणा येईल.

विद्याभ्यासात यश येईल. शास्त्रीय संशोधकांना दिवस चांगले आहेत. वयाच्या ४२ च्या पुढील व्यक्तींना त्यांच्या कामात यश मिळेल. मित्र आयत्या वेळी मदत करतील. या राशीच्या व्यक्ती फारच व्यवहारी असतात. त्यात सध्या इंडिकेट गट यशस्वी आहे. सरकारकडून संपूर्ण सहानुभूतीपूर्वक पाठिंबा मिळण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ८।९।१० या स्थानातून आहे. ते पहिले दोन दिवस सोडून चांगले आहे. सार्वजनिक बाबतीत वावरणाऱ्या व्यक्तींना हा महिना प्रगतीपर आहे. शुभ तारखा २०।२१।२२।२३.

**वृश्चिक :** वडिलोपार्जित मालमत्तेबद्दल सरकार-दरबार करावा लागेल. त्यात यश मिळण्याचा संभव फार कमी. पैशाची तारांबळ उडेल. घरात आजारीपण येण्याची शक्यता आहे. व्यापारातसुद्धा नुकसान होईल.

विद्याभ्यासात यशःप्राप्ती होणे जरा कठीण जाईल. सरकारी कामे पुढे ढकलावीत. मित्रांकडून, पत्नीकडून व भागिदारांकडून सर्व कामात मदत होईल. त्यामुळे वाईट दिवस निभावून जातील. मंगळ-बुध अचानक धनलाभ घडवून आणतील.

चंद्राचे भ्रमण ७।८।९ या स्थानातून आहे. ते चांगले आहे. शनिवारी, रविवारी घरात काहीतरी भाग्यवर्धक घटना घडून येईल. मंगळवार-बुधवार अचानक धनलाभाला चांगले आहेत. गुरुवार-शुक्रवार प्रवासाचा योग आहे. शुभ तारखा सर्व सप्ताह सार्वजनिक कामाला यशदायी आहे.

**धन :** या सप्ताहाच्या सुरुवातीपासूनच धनस्थिती चांगली सुधारेल. सर्व बाजूंनी आवक वाढेल. सरकारी कामात यशःप्राप्ती. घरासंबंधी व्यवहार मनासारखे सुटतील. मान-मान्यता मिळण्याचा योग आहे. धार्मिक प्रवृत्ती वाढेल. प्रतिपक्षीसुद्धा अचानक उपयोगी पडतील.

विद्येत यश येणे जरा जड जाईल. संतती त्रासदायक वागणूक करील. संततीचा उत्कर्ष होण्याचा संभव आहे. धंदा–व्यवसाय ठीक चालेल. मित्रमंडळी मात्र जरा दुर्लक्ष करतील. साहित्यिक, लेखक, प्रकाशकांना प्रगतीपथावर नेणारा सप्ताह आहे. भावंडांशी मतभेद होणार.

चंद्राचे भ्रमण ६।७।८ या घरातून आहे. ते मिश्रफलदायी आहे. शनिवार-रविवारी मातुळ घराण्याकडून आनंदकारक घटना घडतील. अनपेक्षित विवाहाबद्दल मंगळवार-बुधवार वाटाघाट होईल. गुरुवार-शुक्रवारी अचानक धनलाभ होईल. शभ तारखा २०।२१।२२।२३.

**मकर :** बोलण्यात थोडासा उद्धटपणा येईल. धनस्थिती मनासारखी राहील. अत्यंत शुभ योग आहे. भाग्य दशम व एकादश या स्थानांचे अधिपती अन्योन्य योगात

आहेत. स्थिरकुंडलीत हा योग असल्यास ती व्यक्ती नेहमी संपत्तीत बुडालेली असते. मित्रमंडळी, सरकारी अधिकारी सर्व या सप्ताहात मदतीला धावून येतील.

विद्याभ्यासात भरपूर यश मिळेल. मान–मान्यता प्राप्त होईल. सरकारात वजन वाढेल. कलावंत लोकांना भावी यशाची पायाभरणी करणारा आठवडा आहे. जे जे हातात घ्याल त्यात यश:प्राप्ती मिळेल. संततीचा फार मोठा उत्कर्ष होईल. मोठा व्यवसाय किंवा स्थिर स्वरूपाची मोठी नोकरी मिळण्याचा योग आहे.

चंद्राचे भ्रमण ५।६।७ या स्थानातून आहे. ते फारच चांगले आहे. शनिवार–रविवारी मित्रमंडळींकडून शुभकार्याबद्दल संदेश मिळेल. गुरुवार – शुक्रवारी विवाह जमण्याचा योग येईल. सर्व सप्ताह शुभफलदायी आहे.

**कुंभ :** धनस्थिती चांगलीच सुधारेल. सर्व बाजूंनी पैसा मिळेल. संस्था अगर सरकारकडून यावयाची असलेली रक्कम हातात पडेल. भावंडांकरता अचानक प्रवास घडेल. स्थावर मालमत्तेबद्दल मनासारखे निकाल लागतील. घरासंबंधी प्रश्न मनासारखे सुटतील.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती होणे जड जाईल. पराक्रमाला कमीपणा येईल. संततीकडून अपमानकारक वागणूक दिली जाईल. मानहानी होण्याचा दाट संभव आहे. शनिवार-रविवारी घरात शुभसमारंभ घडून येईल. मामाकडील अगर सासुरवाडची माणसे येऊन आनंदात भर घालतील.

चंद्राचे भ्रमण ४।५।६ या घरातून आहे. ते फार चांगले आहे. थोडासा हट्टीपणा वाढेल. तो आवरावा. गुरुवारी-शुक्रवारी सार्वजनिक कामात भाग घ्यावा लागेल. शुभ तारखा १७।१८।१९।२०.

**मीन :** धनस्थानातील शनी पैशाच्या अनेक अडचणी निर्माण करील. वाचाशुद्धी कमी होईल. व्यक्तिमत्त्वाला तडा जाण्याचा संभव आहे. जे करायला जाल त्यात माघार घ्यावी लागेल. फक्त सप्तमातील भाग्येश चतुर्थेश व सप्तमेश बुध-मंगळ शेवटच्या क्षणी संकटातून मुक्त करतील.

विद्याभ्यासात यश:प्राप्ती होईल. संतती चांगली वागेल. संततीचा उत्कर्ष होईल. मंगळवार-बुधवारी मुलाला प्रमोशन मिळाल्याची बातमी ऐकायला मिळेल. उद्योगधंद्यात फारच मंदी राहील. सरकारी कामे होणे कठीण जाईल.

चंद्राचे भ्रमण ३।४।५ घरातून आहे. ते चांगलेच आहे. शनिवार-रविवारी सर्वांकडून प्रत्येक कामात मदत होईल. मंगळवार-बुधवारी कुटुंबातील माणसांच्या सहवासात दिवस आनंदात जातील. शुभ तारखा १९।२०।२१.

¤ ¤ ¤

---

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे द्विसाप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव, पुणे ३० येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

...मुखपृष्ठ २ वरून

आहे. पोराटोरांचे प्रार्तविधी चालले आहेत. बायका तांदुळ निवडताहेत. उरोज झाकून घ्यायचे असतात ही कल्पना एकाही बाईला नाही. कुणाच्याही नजरेत भीती, शंका, व्याकूळता दिसत नाही. भीड वगैरे यांनी जिंकलेली दिसते.

...

**सप्रेम नमस्कार** — पेट्रापूर

अखेर इथपर्यंत मजल मारली. छावणी पाहिली. परवा बशीरहाटला जाणार. दृश्य भयानक. लहान मुलांना पाकिस्तान्यांनी भयानक मारहाण केली आहे.

...

**सप्रेम नमस्कार** — हस्नाबाद

निर्वासित किडुक मिडुक घेऊन सात सात दिवस रखडत रखडत मार खात खात सरहद्द ओलांडत आहेत. मी हे समोर पाहतो आहे. त्यांची रांगच रांग दिसत आहे. एक तर हृदय पिळवटून जाणारं दृश्य......

...

**सप्रेम नमस्कार** — बशिरहाट

आता माझ्या छावण्या पाहून झाल्या. 'भयानक' याच शब्दात त्यांचे वर्णन करावे लागेल. अनेकांशी यासंबंधी बोललो. हे निर्वासित येतात कसे ? का ? या साऱ्या प्रकारात राजकीय रंग कुठे आहे ? ते कशा परिस्थितीत तिथे राहात होते ? इथे आल्यावर ते काय करतात, काय करणार ? ......

खूप नवी माहिती समजली. निर्वासित छावण्यांचे भयानक दृश्य पाहिले. त्यातले चेहरे बरंच काही सांगून गेले...

निर्वासितांचा हा प्रश्न, हा प्रदेश, या छावण्या,
हे चेहरे या साऱ्याचं चित्रण करणारा
एक प्रदीर्घ लेख

# माती जिथली अबीर गुलाल !

## रवींद्र पिंगे

## माणूस
## दिवाळी अंक

MANOOS (Biweekly) : 40 Paise : Regd. No. M–H 649




" तुझं ठीक आहे बाबा ! उद्याची काळजी नाही तुला ! ... "